- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर   संचालक-संपादक : अजय बिवडे

विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शुक्रवार, २१ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २५२ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# सोन्याच्या खाणीत दुर्घटना, १०० हून अधिक जणांचा मृत्यू

## पश्चिम मध्य आफ्रिकन प्रजासत्ताकमध्ये धक्कादायक घटना

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

पश्चिम मध्य आफ्रिकन प्रजासत्ताकमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. सोन्याची खाणीत दुर्घटना घडून तब्बल १०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. कॅमेरुनच्या सीमेजवळ, नाना-माम्ब्रे प्रदेशातील जांबोये गावात ही घटना घडली आहे. दरम्यान, या घटनेत अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. तर अनेकजण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त होत आहे. दरम्यान, जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

ज्या खाणीमुळे लोकांना उदरनिर्वाह मिळत होता, तीच आता मृत्यूचे कारण बनली आहे. मध्य आफ्रिकन प्रजासत्ताकात खाण दुर्घटनेत १०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे, तर अनेक जण अजूनही ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. दरम्यान, सुरुवातीला ३० जणांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले होते, परंतु नंतर हा आकडा १०० हून अधिक झाला. मृतदेह बाहेर काढण्यासाठी बचाव कर्मचाऱ्यांनी अनेक तास हाताने चिखल आणि ढिगारा बाजूला केला. दरम्यान, बचावकार्य झपाट्यानं सुरु करण्यात आलं आहे.

या अपघातानंतर अजूनही अनेक लोक खाणीत अडकल्याची भीती व्यक्त होत आहे. स्थानिक लोक आणि बचाव कर्मचारी मिळून मलबा हटवण्याचे काम करत आहेत. खाणीच्या आत पोहोचणे खूप कठीण आहे. अशा परिस्थितीत अडकलेल्या लोकांना त्वरीत बाहेर काढणे हे बचाव पथकासमोर मोठे आव्हान आहे. काळाच्या ओघात त्याला जिवंत सापडण्याची आशाही कमी होत आहे. दरम्यान, बचाव पथके हाताने ढिगारा बाजूला करून लोकांचा शोध घेत आहेत. खाण कोसळल्यानंतर, घटनास्थळी बचाव कार्यासाठी आवश्यक यंत्रसामग्रीचा अभाव होता. त्यामुळे, बचाव पथके आणि स्थानिक रहिवासी हाताने माती आणि ढिगारा बाजूला करत आहेत. खाणीत अडकलेल्या लोकांना शोधून त्यांचे मृतदेह बाहेर काढणे हे त्यांचे मुख्य काम आहे.



दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, एका लहान खाणीत सोन्याचे उत्खनन केले जात होते. ही एक लहान सोन्याची खाण होती, जिथे स्थानिक लोक खोदकाम करुन सोने काढतात. मध्य आफ्रिकन प्रजासत्ताकातील अनेकांसाठी अशा प्रकारचे लहान प्रमाणावरील खाणकाम हे उत्पन्नाचे साधन आहे. या खाणींमध्ये अनेकदा मोठ्या सुरक्षा उपाययोजनांचा अभाव असतो. बऱ्याच ठिकाणी कामगार साध्या अवजारांनी खोदकाम करतात. बोगद्याला योग्य मजबुतीकरण केलेले नसते, त्यामुळं असा दुर्घटना होत असल्याचं सांगितलं जात आहे.

### थोडक्यात

## पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत दप्तर

**मुंबई :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत दप्तर देण्यासाठी आज प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या योजनेवर १७४ कोटी १९ लाख ३५ हजार ४२४ रुपये खर्च होणार आहेत. राज्यातील ४१ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना या योजनेतून नवीन दप्तर मिळणार आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा २००९ आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा २०२०च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गामध्ये शिकत असलेल्या सुमारे ४१ लाख ४३ हजार विद्यार्थ्यांना मोफत दप्तर देण्याचा प्रस्ताव शिक्षण संचालकांनी शाळेच्या सरकारकडे पाठवल होता. राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने १७४ कोटी रुपयांच्या रक्कमेच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता दिली आहे. ज्या महानगर पालिकांकडून त्यांच्या स्वतःच्या निधीतून विद्यार्थ्यांना दप्तर किंवा त्यासाठीची रक्कम दिली जाते त्या शाळांमधील विद्यार्थ्यांना या राज्यस्तरीय योजनेतून वगळण्यात येणार आहे. सरकारकडून यापूर्वी मोफत पाठयपुस्तके, मध्यान्ह भोजन अशा योजना राबवल्या जात आहेत. त्यामध्ये आता मोफत दप्तर योजनेची भर पडली आहे. ही योजना विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरवणे या विद्यमान योजनेअंतर्गत राबवण्यात येणार आहे. दप्तर हे शैक्षणिक साहित्याचा भाग असल्याने त्याचा खर्च संबंधित निधीतून करण्यात येणार आहे.

# शाळा-महाविद्यालय परिसर टपरीमुक्त करा!

**वृत्तसंस्था, मुंबई**

तरुण पीढी नशेच्या आहारी गेल्यानंतर त्यावर उपायोजना करण्यापेक्षा तरुणांना नशेच्या गर्तेत ढकलणाऱ्या प्रवृत्ती आणि घटकांवरच प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची गरज आहे. त्यानुसार शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात अमली पदार्थांना पोषक वातावरण निर्माण होणार नाही, यासाठी संबंधित परिसर पूर्णपणे टपरीमुक्त करा, याबाबत कोणतीही तडजोड करू नका, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिले. त्याबाबत सर्व शैक्षणिक संस्थांचे परिसर अमली पदार्थमुक्त घोषित करण्याची कार्यवाही प्राचार्य आणि मुख्याध्यापकांनी करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बुधवारी वर्षा निवासस्थानी नशामुक्त महाराष्ट्र धोरणाच्या सादरीकरणासाठी झालेल्या बैठकीत त्यांनी शासकीय यंत्रणेला व्यापक उपाययोजनांची दिशा दिली. नशेच्या दुष्टचक्रात अडकलेल्या तरुणांकडे गुन्हेगार म्हणून नव्हे, तर सहानुभूतीने पाहून त्यांना या



विळख्यातून बाहेर काढावे, असे निर्देश फडणवीस यांनी दिले. नशामुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकारण्यासाठी केवळ पोलिसांची कारवाई पुरेशी नाही. आरोग्य, शिक्षण, गृह, महसूल, परिवहन, अन्न व औषध प्रशासन यांसह सर्व संबंधित विभागांनी आपली जबाबदारी ओळखून एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे.

अमली पदार्थांशी संबंधित संपूर्ण परिसंस्थेवर नियंत्रण आणून प्रतिबंध, उपचार आणि पुनर्वसन या तिन्ही पातळ्यांवर प्रभावी काम झाले, तर महाराष्ट्र नशामुक्त करण्याचे उद्दिष्ट साध्य होऊ शकते, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. बैठकीत अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर यांनी नशामुक्त महाराष्ट्र धोरणाचे सादरीकरण केले. गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम यांच्यासह मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वने) मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, अपर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, प्रधान सचिव अनुपकुमार सिंग, पोलिस महासंचालक सदानंद दाते, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, अमली पदार्थविरोधी कृती दलाच्या विशेष पोलिस महानिरीक्षक ज्योती प्रिया सिंग, अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे आदी उपस्थित होते.

**प्रत्येक शासकीय रुग्णालयात नशामुक्ती केंद्र**

नशेच्या विळख्यात अडकलेल्या तरुणांना त्यातून बाहेर काढण्यासाठी राज्यातील प्रत्येक शासकीय रुग्णालयात नशामुक्ती केंद्र सुरू करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्येही ही केंद्रे कार्यान्वित करावीत. केंद्र शासनाच्या माध्यमातून सुरू असलेल्या नशामुक्ती केंद्रांचे सक्षमीकरण करून आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करून द्यावा, असेही त्यांनी सांगितले.

अमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांमध्ये एनडीपीएस कायद्याचा प्रभावी वापर करून प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी जलदगती न्यायालये स्थापन करण्याची सूचना करण्यात आली. अशा गुन्ह्यांच्या प्रभावी सुनावणीसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर विशेष सरकारी अभियोक्त्यांचे पॅनल तयार करून त्यांची राज्य शासनाच्या अधिकारात नियुक्ती करण्याची तरतूद करावी, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

अमली पदार्थविरोधी कारवाईमध्ये जिल्हास्तरीय समित्यांची भूमिका महत्त्वाची असल्याने त्यांच्या कामगिरीचे नियमित मूल्यमापन करावे. त्यांच्या कामगिरीच्या आधारे जिल्ह्यांची रँकिंग पद्धत विकसित करावी, असे निर्देश फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय एनकॉर्ड शिखर समिती स्थापन करण्याची सूचनाही त्यांनी केली.

# सुट्या खाद्यतेलांच्या विक्रीवर बंदी

**वृत्तसंस्था, मुंबई**

राज्यात आता सुटे खाद्यतेल विक्रीवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. सुट्या तेलाची विक्री करणाऱ्या घाऊक अथवा किरकोळ विक्रेत्यावर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची घोषणा अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी केली आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीला ७ वर्षांपासून आजन्म कारावासाची शिक्षा होऊ शकेल. ३ लाखांपासून ते १० लाख रूपयांपर्यंतचा दंड देखील यासाठी ठोठावण्यात येणार आहे. नागरिकांनी देखील सुटे खाद्यतेल खरेदी करू नये असे आवाहन तुकाराम मुंढे यांनी केले आहे. सर्व खादयतेल उत्पादक ते विक्री करणाऱ्यांना हा नियम लागू असणार आहे.

तुकाराम मुंढे यांनी पत्रकारपरिषदेत आज याची घोषणा केली. २०११ ला आपले एफएसएसआयचे कायदे आले त्यानुसार परवाना असणे व नियमन पाळणे अपेक्षित असल्याचे सांगून तुकाराम मुंढे म्हणाले, आपण याबाबत तपासणी केली. त्यात बारा प्रमुख त्रुटी आढळल्या. खाद्यतेल



निर्मात्या अनेक उत्पादकांकडे लायसन्स, रजिस्ट्रेशन नाही. खादयतेलात मोठया प्रमाणात भेसळ आढळली. ॲसिडिक, औद्योगिक ट्रान्स फॅट आढळले. तेलाचा खरा स्त्रोत तसेच उत्पादन दिनांक लपविण्यात येते. मुदत संपलेले तेल पुन्हा पॅक करून विकण्याचा प्रकार घडतो. ॲगमार्क शिवाय तेल विक्री केले जाते. सुट्या प्रकारात खाद्यतेल विक्री केली जाते. फूड ग्रेड मटेरियल नसलेल्या वेष्टनाचा वापर केला जातो. घातक खनिज तेलाची वाहतूक झालेल्या टँकरमधूनच या खादयतेलाची वाहतूक करण्यात येते. गंजलेल्या कॅनमध्येच पुन्हा तेलाचे पॅकिंग करण्यात येते. २०२५-२६ मध्ये आपण १२४७ खाद्यतेल नमुने तपासले त्यापैकी स्टँडर्ड ११४२ आढळले, सबस्टँडर्ड ७७ केसेस झाल्या तर १३ अनसेफ सापडले. त्यामुळे आता आपण खाद्यतेलाबद्दल विशेष आदेश काढले असल्याचे तुकाराम मुंढे म्हणाले.

**सुट्या तेलावर प्रतिबंध का?**

सुट्या खादयतेल विक्रीवर प्रतिबंध का करण्यात आला याचे कारण सांगताना तुकाराम मुंढे म्हणाले, सुटे तेल किती तारखेला उत्पादित झाले, कोणी केले, कुठून आले याची कोणतीच माहिती मिळत नाही. त्यात कोणते घटक आहेत हे देखील कळत नाही. त्यामुळे त्याच्यावर कारवाई करताना अडचण येते म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. आता उत्पादकांना रजिस्ट्रेशन, लायसन्स बंधनकारक असेल. खाद्यतेलाची विक्री केवळ सीलबंदच करता येईल.

सुटे तेल विकता येणार नाही. सुट्या पद्धतीने तेल पाठविणारा उत्पादक अथवा वितरक हा मूळ उल्लंघनकरता असतो. किरकोळ विक्रेत्याने विनासील अथवा छेडछाड नसलेले पॅकेट नाकारणे आवश्यक आहे. त्यांनी केले नाही तर ते देखील जबाबदार धरले जातील. मोहरीचे तेल शंभर टक्के शुद्धच विकावे लागेल. ज्यात पॅकेजिंग केले जाते ते फूडग्रेडच असले पाहिजे.

# ५७ तहसीलदार उप जिल्हाधिकारी, २५ नायब तहसीलदार तहसीलदारपदी पदोन्नत

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्णय

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

महसूल प्रशासन अधिक सक्षम आणि गतिमान करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने राज्यातील ५७ तहसीलदारांना उप जिल्हाधिकारी (गट-अ), तर २५ नायब तहसीलदारांना तहसीलदार (गट-अ) पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे. त्यामुळे महसूल प्रशासनातील एकूण ८२ अधिकाऱ्यांना पदोन्नतीचा लाभ मिळणार असून रिक्त पदांमुळे निर्माण झालेली प्रशासकीय अडचण कमी होऊन कामकाजाला गती मिळणार आहे.



सन २०२५-२६ च्या निवडसूचीनुसार एस-१९ वेतनश्रेणीतील ५७ तहसीलदारांना एस-२० वेतनश्रेणीतील उप जिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे. तर पूरक निवडसूचीनुसार २५ नायब तहसीलदारांना एस-१४ वरून एस-१९ वेतनश्रेणीत तहसीलदारपदी पदोन्नती देण्यात आली आहे.

पदोन्नत उप जिल्हाधिकाऱ्यांची सविस्तर पदस्थापना सध्या सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमातील काम पूर्ण झाल्यानंतर महसूल विभाग वाटप नियम, २०२१ नुसार स्वतंत्र आदेशाने करण्यात येणार आहे. नायब तहसीलदारांच्या पदस्थापनांचे आदेशही स्वतंत्रपणे काढण्यात येतील.

नायब तहसीलदारांच्या पदोन्नतीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अंतिम मान्यतेची अट लागू आहे. तसेच उप जिल्हाधिकारीपदी पदोन्नत अधिकाऱ्यांना पुढील पदोन्नतीपूर्वी संबंधित महसुली विभागात किमान तीन वर्षे सेवा करावी लागणार आहे.

# इम्रान खान यांना जेलमधून रुग्णालयात हलवणार

**वृत्तसंस्था, इस्लामाबाद**

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खानयांच्या वैद्यकीय उपचारांसंदर्भात पाकिस्तानच्या सुप्रीम कोर्टाने दिलेल्या महत्त्वाच्या आदेशानंतर तिथल्या राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सुप्रीम कोर्टाच्या सूचनेनुसार इम्रान खान यांना रावळपिंडीच्या अदियाला जेलमधून इस्लामाबाद येथील शिफा इंटरनॅशनल हॉस्पिटलमध्ये हलवण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर शिफा रुग्णालयाभोवती पाकिस्तानी लष्कर आणि इस्लामाबाद पोलिसांनी कडक बंदोबस्त तैनात करत संपूर्ण परिसराचा ताबा घेतला आहे.

तुरुंगात असलेल्या इम्रान खान यांच्या तब्येतीबाबत अनेकदा अफवा पसरल्याचं दिसून



आलं. काही वेळा तर त्यांच्या निधनाच्या अफवाही समोर आल्या होत्या. त्यानंतर आता त्यांना तुरुंगातून रुग्णालयात शिफ्ट करण्यात येणार आहे.

**सुप्रीम कोर्टाचा महत्त्वाचा आदेश**

पाकिस्तानच्या सुप्रीम कोर्टाने इम्रान खान यांच्या प्रकृतीचे गांभीर्य आणि आरोग्याचा अधिकार विचारात घेऊन त्यांना शिफा इंटरनॅशनल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्याचे निर्देश दिले होते.

तसेच कोर्टाने इम्रान खान यांच्या कुटुंबाला दर आठवड्याला त्यांची भेट घेण्याची परवानगी दिली आहे. त्यांच्या उपचारांसाठी एक विशेष मेडिकल बोर्ड स्थापन करण्याचे आदेश दिले असून, यामध्ये इम्रान खान यांचे खाजगी डॉक्टर आणि त्यांची बहीण उझमा खान यांचा समावेश असेल.

**शाहबाज शरीफ सरकारला सुप्रीम कोर्टाचा झटका**

इम्रान खान यांना खाजगी रुग्णालयात हलवण्याच्या निर्णयाला विरोध करत पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या सरकारने कोर्टात फेरविचार याचिका दाखल केली होती. मात्र, सुप्रीम कोर्टाच्या रजिस्ट्रार कार्यालयाने ही याचिका अपूर्ण कागदपत्रांचे कारण देत फेटाळून लावली. सरकारचा असा युक्तिवाद होता की, हा निर्णय जेलच्या नियमांचे उल्लंघन करतो आणि यामुळे एका विशिष्ट कैद्याला विशेष सवलत दिल्यासारखे होईल. परंतु कोर्टाने हा युक्तिवाद फेटाळून लावला.

**पीटीआयचा मरियम नवाज यांच्यावर गंभीर आरोप**

दरम्यान, इम्रान खान यांच्या 'पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफ' पक्षाने या विलंबामागे पंजाबच्या मुख्यमंत्री मरियम नवाज यांचा हात असल्याचा आरोप केला आहे. पीटीआयच्या नेत्यांच्या मते, कोटार्चा स्पष्ट आदेश असतानाही मरियम नवाज यांच्या दबावामुळे इम्रान खान यांना रुग्णालयात हलवण्यास उशीर केला जात होता. आता लष्कराने रुग्णालयाची सुरक्षा ताब्यात घेतल्यानंतर त्यांना रुग्णालयात शिफ्ट करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त


संपादकीय लेखणीतून...

## नरेंद्र दाभोळकर : बुद्धिवादी-विज्ञानवादी समाजसुधारक

नरेंद्र अच्युतराव दाभोळकर हे मराठी बुद्धिवादी, विज्ञानवादी, समाजसुधारक व सामाजिक कार्यकर्ते होते. अघोरी सामाजिक प्रथा व अंधश्रद्धांच्या निर्मूलनासाठी अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती या संघटनेसोबत काम करू लागले. अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही संघटना इ.स. १९८२ साली श्याम मानव यांनी स्थापन केली आहे. मात्र इ.स.१९८९ साली नरेंद्र दाभोळकरांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या नावाची वेगळी संघटना सुरू केली. ते स्वतः या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष होते. नरेंद्र दाभोलकर यांची मंगळवार दि.२० ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी साडेसात वाजता पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरानजिक असलेल्या ओंकारेश्वर पूलावर अज्ञातांनी चार गोळ्या झाडून हत्या केली.

नरेंद्रजींचे वडील अच्युत लक्ष्मण दाभोलकर व आई ताराबाई यांच्या दहा अपत्यांपैकी नरेंद्र हे सर्वात धाकटे होत. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील माहुली या गावी दि.१ नोव्हेंबर १९४५ रोजी झाला. सुप्रसिद्ध तत्त्वचिंतक कै.डॉ.देवदत्त दाभोलकर हे त्यांचे सर्वात थोरले बंधू होते. दाभोलकरानी शैला यांच्याबरोबर विवाह केला. त्याना मुक्ता आणि हमीद ही दोन अपत्ये आहेत. सामाजिक कार्यकर्ते हमीद दलवाई यांच्या नावावरून त्यांनी आपल्या मुलाचे नाव ठेवले. लग्न सोहळा व त्या मधील खर्च यावर ते सतत टीका करीत. आपल्या दोन्ही मुलांचे विवाह साध्या पद्धतीने केले. नरेंद्र दाभोलकरांचे माध्यमिक शिक्षण साताऱ्यातील न्यू इंग्लिश स्कूल शाळेत झाले. त्यांनी सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयातून विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. ते राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरचे उत्तम कबड्डीपटू म्हणून क्रीडाजगतात प्रसिद्ध होते. कबड्डीवर उपलब्ध असलेले एकमेव शास्त्रशुद्ध पुस्तकही त्यांनी लिहिले. कबड्डीतील योगदानासाठी त्यांना मानाचा शिवछत्रपती पुरस्कारही मिळाला. इ.स.१९७० साली मिरज वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय शाखेचे शिक्षण पूर्ण केले व त्यानंतर त्यांनी सातारा येथे वैद्यकीय व्यवसाय सुरू केला.

बाबा आढाव यांच्या एक गाव- एक पाणवठा या चळवळीत दाभोलकर यांचा सक्रिय सहभाग होता. त्यानंतर त्यांनी श्याम मानव यांच्या इ.स.१९८२ साली स्थापन झालेल्या अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीमध्ये कार्य सुरू केले. पण नंतर इ.स.१९८९मध्ये त्यापासून वेगळे होऊन त्यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती स्थापन केली. साने गुरुजींनी स्थापन केलेल्या साधना या लोकप्रिय साप्ताहिकाचे ते डिसेंबर १९९८पासून मृत्यूपर्यंत संपादक होते. त्यांची साहित्य संपदा- १) अंधश्रद्धाः प्रश्नचिन्ह आणि पूर्णविरामः राजहंस प्रकाशन २) अंधश्रद्धा विनाशायः राजहंस प्रकाशन ३) ऐसे कैसे झाले भोंदू?ः मनोविकास प्रकाशन ४) ज्याचा त्याचा प्रश्न (अंधश्रद्धा या विषयावरील नाटक- लेखकः अभिराम भडकमकर). या नाटकाचे साडेचारशेहून अधिक प्रयोग झाले आहेत. ५) झपाटले ते जाणतेपणः संपादक नरेंद्र दाभोळकर व विनोद शिरसाठ. ६) ठरलं... डोळस व्हायचंचः मनोविकास प्रकाशन, ७) तिमिरातुनी तेजाकडेः राजहंस प्रकाशन, ८) दाभोलकरांच्या दहा भाषणांची सीडी. ९) प्रश्न तुमचे उत्तर दाभोलकरांचेः डीव्हीडी, निमार्ते - मॅग्नम ओपस कंपनी. १०) प्रश्न मनाचे (सहलेखक डॉ हमीद दाभोलकर)ः राजहंस प्रकाशन ११) भ्रम आणि निरासः राजहंस प्रकाशन, १२) मती भानामती- राजहंस प्रकाशन (सहलेखक माधव बावगे) १३) विचार तर कराल?ः राजहंस प्रकाशन, १४) विवेकाची पताका घेऊ खांद्यावरी- दिलीपराज प्रकाशन, १५) श्रद्धा-अंधश्रद्धा- राजहंस प्रकाशन (इ.स. २००२) अशी आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी, परंपरा मोडीत काढण्यासाठी लोकप्रबोधन करण्यात येते. महाराष्ट्र जादूटोणाविरोधी विधेयक विधिमंडळात मंजूर व्हावे, यासाठी ते गेल्या काही वर्षांपासून कार्यरत होते. यासंदर्भात सातत्याने विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांची भेट घेऊन विधेयकाच्या बाजूने सर्वपक्षीय मत बनवण्याचे काम ते करीत होते. समाजातील अनेक भोंदू बाबांचे पितळ दाभोलकर आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी सप्रयोग उघडे केले होते.

"मला माज्याच देशात पोलीस स्वतःच्या लोकांकडून संरक्षण घ्यायचे असेल तर मला काहीतरी चुकीचे वाटते, मी भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत लढा देत आहे आणि हे कोणाविरुद्ध नाही तर सर्वांसाठी आहे." - पोलीस संरक्षण नाकारण्यावर दाभोलकर. नरेंद्र दाभोलकर यांची २० ऑगस्ट २०१३ मंगळवारी सकाळी साडेसात वाजता पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरानजिक असलेल्या महर्षी शिंदे पुलावर-प्रचलित नाव असणाऱ्या ओंकारेश्वर पूलावर अज्ञातांनी चार गोळ्या झाडून हत्या केली. पुण्यामध्ये असताना ते रोज सकाळी घरापासून ते बालंगधर्व रंगमंदिरापर्यंत फिरायला जात असत. अशातच मंगळवार दि.२० ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी घरून निघाल्यावर दाभोलकर शिंदे पुलावरून रस्त्याच्या ओंकारेश्वर मंदिराच्या विरुद्ध बाजूला असलेल्या कडेने साधना साप्ताहिक कार्यालयाच्या दिशेने निघाले होते. पुलावर असताना सकाळी साडेसातच्या सुमारास त्यांच्यावर दोन अज्ञात हल्लेखोरांनी चार गोळ्या झाडल्या. एक गोळी त्यांच्या पाठीच्या बाजूला लागली, एक चुकीच्या दिशेने गेली.

# भारतीय निवडणूक व्यवस्थेचा जागतिक गौरव

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भारताच्या निवडणूक आयोगाच्या जागतिक पातळीवरील कामगिरीचे अमेरिकेसारख्या देशांकडून वेळोवेळी कौतुक झाले आहे. लोकशाही प्रक्रियेत पारदर्शकता आणि निष्पक्षता राखण्यासाठी निवडणूक आयोगाची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय निवडणूक प्रणालीतील फोटो ओळखपत्र आणि प्रचंड मोठ्या प्रमाणावरील पारदर्शक मॅनेजमेंटचे कौतुक केले आहे. भारताच्या निवडणूक आयोगाची जगभरात प्रशंसा होत असतानाच देशांतर्गत राजकीय पक्षांकडून आणि विरोधकांकडून यंत्रणेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असल्याने या मुद्यावर विविध राजकीय व कायदेशीर पैलू चर्चिले जात आहेत.

भारताची निवडणूक प्रक्रिया ही जगातील सर्वात मोठी लोकशाही कसरत असून, कोट्यवधी मतदारांचा सहभाग, पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यामुळे जागतिक स्तरावर तिची प्रशंसा होते. जेव्हा जेव्हा आंतरराष्ट्रीय संस्था किंवा देश भारतीय लोकशाहीच्या या अवाढव्य टप्प्याचा गौरव करतात, तेव्हा निवडणूक यंत्रणेवर सातत्याने शंका घेणाऱ्या विरोधकांनी आपल्या धोरणांचे व भूमिकेचे आत्मपरीक्षण करण्याची खरी वेळ आलेली असते. अमेरिकेत निवडणूक नियमांचे आचरण कडक करण्यासाठी ट्रम्प यांनी भारताचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला आहे. भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी अमेरिकेच्या प्रशासनाला विचारले होते की, वैध फोटो ओळखपत्राशिवाय निवडणुका कशा घेतल्या जाऊ शकतात? भारताच्या लोकसभा निवडणुकीत ६४ कोटींहून अधिक मतदारांनी फोटो आयडीच्या आधारे मतदान केले, ज्यामध्ये पोस्टल मतदानाचे प्रमाण १ टक्क्यांपेक्षाही कमी होते.

भारतातील कोट्यवधी मतदारांसाठी सुरळीतपणे निवडणुका पार पाडण्याचे निवडणूक आयोगाचे नियोजन जागतिक स्तरावर कौतुकास्पद ठरले आहे. इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनच्या वापरामुळे मतमोजणीतील पारदर्शकता आणि अचूकता वाढली आहे, ज्याची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली जाते. दुर्गम भागातील मतदारांपर्यंत पोहोचून सुरक्षित वातावरणात मतदान प्रक्रिया पूर्ण करणे हे आयोगाचे मोठे यश मानले जाते.

भारताची निवडणूक प्रक्रिया ही जगातील सर्वात मोठी लोकशाही कसरत असून, कोट्यवधी मतदारांचा सहभाग, पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यामुळे जागतिक स्तरावर तिची प्रशंसा होते. जेव्हा जेव्हा आंतरराष्ट्रीय संस्था किंवा देश भारतीय लोकशाहीच्या या अवाढव्य टप्प्याचा गौरव करतात, तेव्हा निवडणूक यंत्रणेवर सातत्याने शंका घेणाऱ्या विरोधकांनी आपल्या धोरणांचे व भूमिकेचे आत्मपरीक्षण करण्याची खरी वेळ आलेली असते. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी विरोधकांकडून काही मुद्द्यांवर वारंवार आक्षेप घेतले जातात.

भारतामधील विरोधी पक्षांनी (उदा. काँग्रेस पक्ष) निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर, मतदारयाद्यांच्या व्यवस्थापनावर आणि ईव्हीएमच्या पारदर्शकतेवर वारंवार आक्षेप घेतले आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, भारतीय निवडणूक यंत्रणेची विश्वासार्हता आणि मजबुती हे जागतिक पातळीवर सुप्रसिद्ध सत्य आहे. विरोधकांचे म्हणणे आहे की मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या निवडणुका आणि तांत्रिक गोष्टींमध्ये अजून सुधारणा व विरोधकांचा सहभाग आवश्यक आहे.

मतदानाची विश्वासार्हता शंभर टक्के सिद्ध करण्यासाठी व्हीव्हीपॅटच्या पावत्यांची पूर्ण पडताळणी व्हावी, अशी मागणी विरोधकांकडून केली जाते.निवडणूक आयोगाच्या नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता असावी आणि कोणत्याही राजकीय दबावाशिवाय निर्णय घेतले जावेत, यावर विरोधक भर देतात. निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्या सर्व पक्षांच्या नेत्यांवर पक्षपात न करता समान कारवाई व्हावी, असा आक्षेप नेहमी घेतला जातो. विरोधी पक्षाकडून विवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित करण्यात येत असले तरी एकाच वेळी देशभरात कोट्यवधी लोकांचे मतदान पार पडणे हे जगासाठी आश्चर्याचे आणि अभ्यासाचे ठिकाण झाले आहे. ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट सारख्या तंत्रज्ञानामुळे निवडणूक निष्पक्ष आणि जलद होण्यास मदत होत आहे. दुर्गम भागांत, जंगलांत व बर्फाच्छादित प्रदेशांत जाऊन निवडणूक आयोग मतदान पार पाडतो, ज्याचे जागतिक स्तरावर कौतुक होत आहे.

पराभव झाल्यानंतर थेट निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याऐवजी, जनतेच्या मनातील बदल ओळखणे गरजेचे आहे. केवळ विरोधाचे राजकारण न करता जनतेला पटणारा सकारात्मक आणि विकासात्मक पर्याय देण्याची गरज आहे.डिजिटल युगात केवळ आरोप-प्रत्यारोप न करता मतदारांच्या थेट समस्या समजून घेण्यात कमी पडणाऱ्या मुद्द्यांवर विचार करणे आवश्यक आहे.

जागतिक स्तरावरील कौतुक हे भारताच्या निवडणूक व्यवस्थेचे सामर्थ्य दाखवते, तर विरोधकांचे आक्षेप आणि सुधारणांच्या मागण्या या लोकशाहीतील निवडणूक प्रक्रिया अधिक निर्दोष करण्यासाठी महत्त्वाच्या मानल्या जातात.

**भारत आणि अमेरिकेतील निवडणूक प्रणालींमध्ये काय फरक आहेत?**

भारतातील निवडणूक प्रणाली अमेरिकेपेक्षा अधिक केंद्रीकृत आहे. निवडणुकांवर देखरेख ठेवण्याची आणि त्यांचे व्यवस्थापन करण्याची घटनात्मक जबाबदारी भारतीय निवडणूक आयोगावर आहे. याउलट, अमेरिकेतील निवडणुका प्रामुख्याने राज्य आणि स्थानिक प्राधिकरणांद्वारे प्रशासित केल्या जातात. त्यामुळे, मतदार नोंदणी, ओळखपत्रे आणि मतदान पद्धतींसंबंधीचे नियम राज्यानुसार वेगवेगळे असू शकतात. यामुळेच अमेरिकेत देशभरात मतदार ओळखपत्रासंबंधी एकसमान नियमांचा अभाव आहे, तर भारत निवडणूक आयोगाच्या अंतर्गत राष्ट्रीय निवडणूक संरचना चालवतो.

- ९५६१५९४३०६

# कसोटी क्रिकेटमधील 'कन्कशन सबस्टिट्यूट' आणि अनपेक्षित कसोटी पदार्पण

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

कसोटी क्रिकेट हा खेळाडूंच्या तंत्राचा, संयमाचा आणि शारीरिक क्षमतेचा कस पाहणारा खेळ मानला जातो. लाल चेंडूचा उसळता मारा आणि वेगवान गोलंदाजी यामुळे खेळाडूंना दुखापत होण्याचा धोका नेहमीच असतो. खेळाडूंच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसीने) १ ऑगस्ट २०१९ पासून 'कन्कशन सबस्टिट्यूट' हा क्रांतिकारी नियम लागू केला. या नियमानुसार, सामन्यादरम्यान चेंडू डोक्याला किंवा मानेला लागून खेळाडू जायबंदी झाल्यास, त्याच्या जागी संपूर्ण सामन्यासाठी तशाच क्षमतेचा बदली खेळाडू ( लाईक फॉर लाईक रिप्लेसमेंट) मैदानात उतरवता येतो. हा बदली खेळाडू मूळ खेळाडूप्रमाणेच फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण करू शकतो.

**१. कन्कशन सबस्टिट्यूटचा ऐतिहासिक संदर्भ आणि एकूण व्याप्ती**

या नियमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी कसोटी इतिहासात सर्वप्रथम ऑगस्ट २०१९ मधील प्रसिद्ध अँशेस मालिकेत झाली. लॉर्ड्स येथील कसोटी सामन्यात इंग्लंडच्या जोफ्रा आर्चरचा वेगवान उसळता चेंडू लागल्यामुळे ऑस्ट्रेलियाचा प्रमुख फलंदाज स्टीव्ह स्मिथ गंभीर जखमी झाला. त्याच्या जागी मार्नस लाबुशेन हा कसोटी इतिहासातील पहिला कन्कशन सबस्टिट्यूट खेळाडू म्हणून मैदानात उतरला. लाबुशेनने मिळालेल्या या संधीचे सोने करत अर्धशतकी खेळी साकारली आणि पुढे तो जागतिक क्रिकेटमधील एक अव्वल फलंदाज म्हणून नावारूपास आला.

२०१९ पासून आजतागायत पुरुष आंतरराष्ट्रीय कसोटी क्रिकेटमध्ये १५ पेक्षा अधिक खेळाडूंनी कन्कशन सबस्टिट्यूट म्हणून भूमिका बजावली आहे. यामध्ये वेस्ट इंडिजचा जर्मेन ब्लॅकवूड (डॅरेन ब्राव्होच्या जागी), २०१९ च्या कोलकाता येथील ऐतिहासिक दिवस-रात्र कसोटीत



बांगलादेशकडून खेळलेले मेहिदी हसन मिराझ व तैजुल इस्लाम, वेस्ट इंडिजचा शमारा ब्रूक्स आणि बांगलादेशचा अनामुल हक बिजय यांसारख्या प्रमुख खेळाडूंचा समावेश आहे.

**२. कन्कशन सबस्टिट्यूटच्या माध्यमातून झालेले कसोटी पदार्पण**

क्रिकेटच्या इतिहासात अशी अनेक उदाहरणे आहेत जिथे खेळाडूंना अंतिम अकरा (प्लेइंग इलेव्हन) मध्ये स्थान मिळाले नव्हते, परंतु सामन्यादरम्यान सहकारी खेळाडूच्या डोक्याला दुखापत झाल्यामुळे त्यांना थेट आणि अनपेक्षितपणे कसोटी पदार्पणाची (टेस्ट डेब्यू) अधिकृत टोपी मिळाली. असे दुर्मीळ पदार्पण करणाऱ्या प्रमुख खेळाडूंचा प्रवास खालीलप्रमाणे राहिला आहेः

ब्रायन मुदझिंगान्यामा (झिम्बाब्वे - २०२०): कन्कशन सबस्टिट्यूट म्हणून आंतरराष्ट्रीय कसोटी पदार्पण करणारा ब्रायन हा जगातील पहिला खेळाडू ठरला. जानेवारी २०२० मध्ये हरारे येथे श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी सामन्यात झिम्बाब्वेचा सलामीवीर केविन कसुझा क्षेत्ररक्षण करताना चेंडू डोक्याला लागल्याने जखमी झाला. त्यानंतर मुदझिंगान्यामाला दुसऱ्या डावात थेट पदार्पणाची संधी मिळाली.

खया झोंडो (दक्षिण आफ्रिका - २०२२): एप्रिल २०२२ मध्ये बांगलादेशविरुद्धच्या गेकेबरहा कसोटीत दक्षिण आफ्रिकेचा क्षेत्ररक्षक सायरल एरवी डोक्याला दुखापत झाल्यामुळे बाहेर पडला. त्यावेळी खया झोंडोला संघात समाविष्ट करण्यात आले आणि त्याने आपले आंतरराष्ट्रीय कसोटी पदार्पण पूर्ण केले.

मॅथ्यू पार्किन्सन (इंग्लंड - २०२२): जून २०२२ मध्ये लॉर्ड्स येथे न्यूझीलंडविरुद्ध खेळताना इंग्लंडचा फिरकीपटू जॅक लीच सीमारेषेवर क्षेत्ररक्षण करताना डोक्यावर आदळला आणि त्याला कन्कशनचा त्रास झाला. कौंटी क्रिकेट खेळत असलेल्या पार्किन्सनला तातडीने कारने लॉर्ड्सवर बोलावण्यात आले आणि त्याने थेट कसोटी पदार्पण करत गोलंदाजीही केली.

बाहीर शाह (अफगाणिस्तान - २०२३): जून २०२३ मध्ये मीरपूर येथे बांगलादेशविरुद्ध झालेल्या एकमेव कसोटीत अफगाणिस्तानचा कर्णधार हशमतुल्लाह शाहिदी दुखापतग्रस्त झाला. त्याच्या जागी युवा फलंदाज बाहीर शाह याला संधी देण्यात आली आणि त्याने कन्कशन सबस्टिट्यूटच्या रूपाने आपले कसोटी पदार्पण साजरे केले.

पसिंदू सूरियाबंदारा (श्रीलंका - २०२६): गॉल येथे भारताविरुद्धच्या कसोटी सामन्यादरम्यान श्रीलंकेचा अनुभवी यष्टीरक्षक-फलंदाज दिनेश चांदीमल उसळता चेंडू लागल्यामुळे सामना अर्धवट सोडून बाहेर पडला. त्या वेळी राखीव खेळाडू असलेल्या पसिंदू सूरियाबंदाराला फलंदाज म्हणून संघात स्थान मिळाले आणि त्याचे कसोटी पदार्पण झाले.

**३. क्रिकेटच्या दृष्टिकोनातून या नियमाचे महत्त्व**

कन्कशन सबस्टिट्यूट नियमामुळे क्रिकेट जगतात खेळाडूंच्या आरोग्याविषयी मोठी सजगता निर्माण झाली आहे. पूर्वीच्या काळी खेळाडू डोक्याला दुखापत झाली तरी संघाचे नुकसान होऊ नये म्हणून वेदना सहन करत खेळत असत, ज्यामुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण होत असे. या नव्या नियमाने संघांना सुरक्षित पर्याय दिला आहे.

तसेच, ज्या राखीव खेळाडूंना अशा पद्धतीने अनपेक्षित पदार्पणाची संधी मिळते, त्यांच्यासाठी ही मानसिक तयारीची अत्यंत मोठी कसोटी असते; कारण कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय त्यांना जगातील सर्वात आव्हानात्मक क्रिकेट प्रकारात थेट मैदानात उतरावे लागते.

- ९०९६३७२०८२

# रंग मराठमोळी संस्कृतीचा आणि श्रावण

डॉ. प्रकाश पांडे
वाशीम

श्रावण प्रतिपदेपासून वर्षा ऋतूतील अत्यंत पवित्र समजल्या जाणाऱ्या श्रावण मासाची सुरुवात होते, मराठी संस्कृतीतून विचार करायचा झाल्यास सणांची सुरुवात याच महिन्यात होते. द्वितीयेला जिवती पूजनाने सुरुवात करून महादेवाच्या भक्तीसाठी हा महिना विशेष मानल्या जातो यातील महादेवाचा पवित्र वार प्रत्येक सोमवारी विशेष आराधना केली जाते, यादिवशी व्रत, उपवास,बेल पांढरी रुईची आणि इतर फुले वाहून देवा विषयी श्रद्धे प्रमाणे अर्पण केले जाते.

यानंतर नागपंचमीच्या सणाला मराठी स्त्रिया सौभाग्याचा शृंगार करून वारुळाला जाऊन आनंदी वातावरणात नाच गाणी म्हणत नाग पूजा करतात, यातून शेतकऱ्यांचा मित्र देवाच्या गळ्यातील ताईत म्हणून सापांना वाचविण्याचा संदेश दिला जातो, याच महिन्यात महादेवाच्या अभिषेकासाठी पवित्र नद्यांचे पाणी घेऊन कवाडीचे आयोजन केले जाते. माहेरवाशिणींसाठी हा महिना विशेष आहे, याच दिवशी झोक्याचेही फार महत्त्व आहे झाडाला झोका बांधून लहानांपासून मोठ्यांपर्यंत झोक्याचा आनंद लुटतात. करेच्या दिवशी काही ठिकाणी विशेषतः ग्रामीण भागात मातीच्या चिखलाची महिला सुंदरशी देवाची मुर्ती तयार करतात त्यावर शेतातील धान्य ज्वारी,डाळी करडी लाऊन ती अजून सुशोभित करतात,त्या मुतीर्ची गावात मिरवणूक काढून पारंपरिक गाणी



म्हणत रात्री जागरण करून विविध कार्यक्रम करतात सकाळी नदीवर या मुर्तीचे विसर्जन करुन सांगता होते.

यानंतर येणारा भावा बहिणींचा सण म्हणजे सर्वत्रच साजरा होणारा रक्षाबंधन यावेळी बहिण भावाला राखी बांधण्यासाठी मुद्दाम माहेरी येते, किंवा भाऊ लग्न झालेल्या बहिणीच्या घरी जाऊन राखी बांधून घेतो तेव्हा भाऊ तीला रक्षणाची हमी देतो तसेच बहिण त्याच्या सौख्याची कामना करते असा हा पवित्र बंधनाचा उत्सव साजरा होतो.

यानंतर येणारा गोकुळाष्टमीचा उत्सव ठिकठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो या दिवशी उपवास करून श्रीकृष्ण जन्माष्टमीला विविध कार्यक्रम आयोजित केले जातात तसेच दुसऱ्या दिवशी गोपाल काल्याच्या कार्यक्रमात दहिहंडी उत्सव असतो यावेळी सारे बाळ गोपाळ जमून हा उत्सव अतिशय आनंदात साजरा करतात.

नंतर या महिन्यातील शेवटच्या दिवशी श्रावण अमावास्येला शेतकऱ्यांचा उत्साहाचा सण म्हणजे पोळा, ग्रामीण भाग हा शेतीशी निगडित असल्याने विशेषकरून इथे अति उत्साहाने आणि आनंदाने हा उत्सव धुमधडाक्यात साजरा केला जातो यात वर्षभर काम करणाऱ्या बैला विषयी कृतज्ञता व्यक्त केली जाते, यावेळी शेतकऱ्यांच्या घरोघरी पान सुपारीचा कार्यक्रम असतो शेतकरी एकमेकांना भेटी देऊन प्रेम व्यक्त करतात, याच महिन्यात शेतातील पिकांना रानावनात फळा फुलांना बहर आलेला असतो अतिशय उत्साहाचा आणि आनंदाचा हा महिना असतो.

## मरणाला फुटली पालवी

पहाटेची वेळ, अंगणात झाडाखाली पडलेली पाने पाहत होते विचार आला, पहा काल हिरवीगार असणारी पाने,आज पिवळी होऊन जमिनीवर विसावली आहेत, फांद्या मात्र शांत! स्थितप्रज्ञ! मनात विचार, झाडाचं आयुष्य संपलं तर नाही? अचानक एका फांदीवर एक नवीन इवलीशी पालवी डोकावतांना दिसली, खूप लहान, नाजुकश्या त्या पालवीत किती मोठा संदेश दडलेला होता, आपलं जीवन असंच नाही का? अनेक घडामोडी सुखदुःखाचे प्रसंग घडतात बालपण संपतं, स्वप्ने बदलतात, काही जिवाभावाची माणसे आयुष्यातूनच दूर जातात, तीव्र दुखामुळे मन इतकं भरून येतं, वाटतं आता काही उरलं नाही आयुष्यात,पण निसर्ग आपल्याला थांबू देत नाही.



रात्र कितीही काळोखी असली तरी उगवत्या सूर्याला कोण थांबवू शकणार? उन्हाळा कडक असला तरी पावसाळा येणारच हा निसर्गाचा स्वयंसिद्ध नियम! कोण बदलवणार? पानगळ झाली, तरी झाडाला नवीन पालवी फुटणारच! निसर्ग आपल्याला यातच जीवनाचं सुंदर गुपित सांगतो एखाद्या गोष्टीतीचा शेवट म्हणजे सर्व काही संपलं असं कधीच होऊ शकत नाहीं प्रिय व्यक्तिला गमावण्याचं दुःख कितीही मोठं असलं तरी त्यांच्या आठवणींच्या स्वरूपात ते मनात असतातच आठवणींच्या स्वरूपात नव्या जीवनाची पालवी फुटत असते आणि मनात अलगद सूर उमटतो- --

*कितने दिन आंखे तरसेंगी*
*कितने दिन दिल युं तरसेंगे*
*आज नही तो कल*
*नया सबेरा आयेगा*

**- प्रतिभा पिटके, अमरावती**

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

## साखरेचा गोडवा महागला, ग्रामीण भागात ७० रुपये किलोने विक्री!

### महागाईची झळ सर्वसामान्यांच्या खिशाला, दर नियंत्रणात ठेवण्याची नागरिकांची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिक आधीच आर्थिक अडचणीत असताना आता साखरेच्या वाढलेल्या दराने त्यांच्या घरगुती बजेटला



मोठा फटका बसत आहे. ग्रामीण भागातील किरकोळ बाजारात साखरेची विक्री सध्या तब्बल ७० रुपये किलो दराने होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. रोजच्या वापरातील साखर महागल्याने गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना महागाईचा अतिरिक्त भार सहन करावा लागत आहे. चहा, दूध, घरगुती पदार्थ, मिठाई तसेच विविध खाद्यपदार्थांसाठी साखरेचा नियमित वापर केला जातो. त्यामुळे साखरेच्या दरवाढीचा थेट परिणाम घरखर्चावर होत आहे. आधीच तेल, डाळी, तांदूळ, भाजीपाला आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतीमुळे नागरिक त्रस्त आहेत. त्यात आता साखरेच्या दरात वाढ झाल्याने सर्वसामान्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे.

ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांचे उत्पन्न मर्यादित असल्याने दैनंदिन खर्च भागविताना नागरिकांना काटकसर करावी लागत आहे. साखरेचा दर वाढल्याने महिन्याच्या किराणा खर्चातही वाढ होत असून, महागाईचा सर्वाधिक फटका कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना बसत आहे. साखरेच्या दरात अचानक वाढ का झाली, याबाबतही ग्राहकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. साखरेच्या वाढलेल्या दराचा परिणाम चहा टपरी, हॉटेल, मिठाई दुकानदार आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांवरही होत आहे. उत्पादन खर्च वाढल्याने भविष्यात चहा, मिठाई आणि इतर खाद्यपदार्थांच्या किमती वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे साखरेच्या दरवाढीची साखळी थेट ग्राहकांच्या खिशावर परिणाम करणारी ठरत आहे. ग्रामीण बाजारपेठेत साखरेची विक्री नेमक्या कोणत्या दराने होत आहे, घाऊक आणि किरकोळ दरामध्ये किती फरक आहे, तसेच बाजारात पुरेसा साठा उपलब्ध आहे की नाही, याची संबंधित प्रशासनाने तातडीने तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अनावश्यक दरवाढ, साठेबाजी किंवा कृत्रिम टंचाई निर्माण केली जात असल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही पुढे आली आहे.

साखर ही सर्वसामान्यांच्या दैनंदिन वापरातील अत्यावश्यक वस्तू असल्याने शासनाने तिच्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी पावले उचलावीत. ग्रामीण भागातील नागरिकांना परवडणाऱ्या दरात साखर उपलब्ध करून देण्यासाठी पुरवठा व्यवस्था सुरळीत करावी आणि बाजारातील दरांवर नियमित देखरेख ठेवावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

# "घर का भेदी लंका ढाए"

## पुतण्यानेच मारला लाखोंवर डल्ला

### कोराडीतील चोरीचा गुन्हा २४ तासांत उघड, २७.७८ लाखांचा मुद्देमाल जप्त



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

कोराडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या चोरीच्या गुन्ह्याचा छडा गुन्हे शाखेच्या युनिट क्र. ६ पथकाने अवघ्या २४ तासांत लावला. विशेष म्हणजे, चोरीच्या प्रकरणातील संशयित आरोपी हा फिर्यादीचा पुतण्या असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी संशयिताला ताब्यात घेत त्याच्याकडून तब्बल २७ लाख ७८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोराडी येथील KTPS कॉलनीतील रहिवासी संदीप वामनराव वानखेडे (वय ४९) यांच्या राहत्या घरातून १६ ऑगस्ट रोजी रात्री 2 वाजेपासून १८ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत सोन्याच्या वस्तू चोरीला गेल्या. याप्रकरणी कोराडी पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ३६६/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट क्र. ६ कडून सुरू असताना पोलिसांना मिळालेल्या खात्रीशीर गुप्त माहितीच्या आधारे तसेच तांत्रिक तपासाच्या मदतीने शांतनू चंदू वानखडे (वय २३, रा. माधान, ता. चांदूरबाजार, जि. अमरावती) याचा शोध घेण्यात आला. तो फियार्दी संदीप वानखेडे यांचा पुतण्या असल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली.

पोलिसांनी शांतनू वानखडे याला ताब्यात घेऊन चौकशी केली. तपासादरम्यान त्याच्याकडून चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यामध्ये सोन्याची नाणी, मंगळसूत्र, चैन, बांगड्या, कानातील रिंग, अंगठी तसेच विवो कंपनीचा मोबाईल फोन यांचा समावेश आहे.

जप्त केलेल्या सोन्याच्या वस्तूंचे एकूण वजन सुमारे २३ तोळे असून, पोलिसांनी जप्त मुद्देमालाची एकूण किंमत २७ लाख ७८ हजार रुपये असल्याचे नमूद केले आहे.

गुप्त माहिती, तांत्रिक तपास आणि तत्पर कारवाईच्या आधारे गुन्ह्याचा अवघ्या २४ तासांत छडा लावण्यात आला. आरोपीची वैद्यकीय तपासणी करून पुढील कारवाईसाठी त्याला कोराडी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

या कारवाईमुळे कोराडीतील चोरीच्या गुन्ह्याचा वेगाने तपास करून मोठ्या किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात गुन्हे शाखा युनिट क्र. ६ ला यश आले आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक भरत कऱ्हाडे, सहा.पोनि सचिन गायकवाड, पोउपनि राहुल रोटे सफौ. मुकेश खांडरे, पोलीस अंमदार सुनील यादव, दिनेश महल्ले वाहन चालक पो हवा. चंद्रशेखर भारती, मनिष मिश्रा गुन्हे शाखा युनिट क्र. ६ यांच्या पथकाने केली.

थोडक्यात

## मौदा येथे बीटस्तरीय शिक्षण परिषद संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

मौदा तालुक्यातील बोरगाव अरोली व धानोली या केंद्रातील सर्व जिल्हा परिषद व इयत्ता पाचवी ला शिकवणारे खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षक यांची शिक्षण परिषद पंचायत समिती सभागृह येथे दिनांक २० ऑगस्टला घेण्यात आली. या प्रशिक्षणास उपरोक्त तीन केंद्रातील जवळपास ५१ शिक्षकांनी यात सक्रिय सहभाग घेतला. जिल्हास्तरीय तज्ञ इचिंद्र मस्के विषय गणित व मंगला गभने विषय तज्ञ भाषा यांनी शिक्षकांना पीपीटी च्या माध्यमातून व कृतीयुक्त पद्धतीने भरीव प्रशिक्षण दिले.

यात त्यांनी प्री-टेस्ट व प्रशिक्षणात मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग साधून पोस्ट टेस्ट च्या माध्यमातून सदर प्रशिक्षण पार पाडले. या प्रशिक्षणास गटशिक्षणाधिकारी लीना वालोदे, शिक्षण विस्तार अधिकारी संकेत मरसकोल्हे व ललिता चामट या प्रामुख्याने उपस्थित होत्या. या प्रशिक्षणाच्या यशस्वीते करिता जुगलकिशोर बोरकर, केंद्रप्रमुख बोरगाव, अरविंद भिवगडे केंद्रप्रमुख धानोली व रुस्तम मोटघरे केंद्र अरोली तसेच विषय तज्ञ चेतलाल कटरे,श्रीमती रिता नेवारे, कावेरी गायधनी, सुनिता चौधरी यांनी विशेष प्रयत्न केले.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार रविवारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राष्ट्रीय चर्मकार महासंघ, शाखा नागपूर व श्री संत रविदास छात्रालय संस्थेच्यावतीने राजर्षी शाहू महाराज व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम रविवार, २३ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता. श्री संत रविदास सांस्कृतिक सभागृह, हनुमान नगर, नागपूर येथे होणार आहे. या कार्यक्रमात समाजातील इयत्ता १० वी व १२ वीतील गुणवंत विद्यार्थ्यांसह सेवानिवृत्त कर्मचारी आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष नानासाहेब घोलप असून उद्घाटक म्हणून खासदार श्यामकुमार बर्वे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमा प्रसंगी मुख्य अतिथी पाहुणे म्हणू डॉ. पी एस चंगोले यांची उपस्थिती राहतील. तसेच प्रमुख अतिथी पाहुण्यांमध्ये महापौर नीताताई ठाकरे, आमदार मोहन मते, अभिजीत वंजारी, भाऊ दायदार, माधवराव गायकवाड, महेंद्र भागवतकर, भूषण मांडस्कर, संजय महाकाळकर, लखन येरवार, योगेश पाचपोर, माधुरी बाविस्कर, रमेश तांबटकर, लीलाधर कानोडे, मीना भागवतकर आणि पंढरीनाथ तांबटकर यांची उपस्थिती राहतील. तसेच समाजबांधवांनी व विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रदेश सचिव लीलाधरजी कानोडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे तथा आयोजकांनी केले आहे.

## निसर्ग बैठकच्या पहिल्या सत्रात 'वृक्ष कायदा- वृक्षांनाही हक्क आहेत' विषयावर संवाद शनिवारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

निसर्ग, वन्यजीव आणि पर्यावरणाशी संबंधित विषयांवर अर्थपूर्ण संवाद घडवून आणण्याच्या उद्देशाने वाईल्ड अजाईल फाउंडेशनतर्फे निसर्ग बैठक या नवीन उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत पहिल्या सत्राचे आयोजन वृक्ष कायदा-वृक्षांनाही हक्क आहेत या विषयावर करण्यात आले आहे. शनिवार, दि. २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ ते ७ वाजता. बर्डी येथील पूर्व विदर्भ महिला परिषद सभागृह, व्हिबग्योर स्कूलजवळ, मेट्रो पिलर क्रमांक २८१ समोर, नागपूर येथे हे सत्र होणार आहे. पर्यावरण विषयक कायद्यांच्या माध्यमातून वृक्ष संरक्षण कशा प्रकारे केले जाते, वृक्ष कायद्याचे महत्त्व काय आहे आणि वृक्षांबाबत नागरिकांनी कोणत्या बाबी जाणून घेणे आवश्यक आहे, याबाबत या सत्रात मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या सत्रासाठी पर्यावरण विषयक कायदेतज्ज्ञ कृष्णा अग्रवाल प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या मार्गदर्शनातून वृक्ष संरक्षणाशी संबंधित कायदेशीर बाबी तसेच नागरिकांची भूमिका यावर संवाद साधला जाणार आहे.

निसर्ग बैठक हा वाईल्ड अजाईल फाउंडेशनचा नियमित संवादात्मक उपक्रम असून, चर्चासत्रे, चित्रपट, कला, अनुभव आणि संवादाच्या माध्यमातून निसर्ग, वन्यजीव व पर्यावरणाशी संबंधित विविध विषय समजून घेण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. निसर्ग समजून घेणे हीच त्याच्या संवर्धनाची पहिली पायरी आहे, या विचारातून या उपक्रमाची संकल्पना साकारण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून इच्छुकांनी पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना विनंतीनुसार सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या पहिल्या सत्रासाठी पूर्व विदर्भ महिला परिषद आणि त्यांच्या टीमचे विशेष सहकार्य लाभले आहे.

## वाठोड्यात ए.ए.ची प्रादेशिक सार्वजनिक माहिती कार्यशाळा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अल्कोहोलिक्स अनोनिमस (ए.ए.)च्या वतीने २१ ते २३ ऑगस्टदरम्यान नागपूर जिल्ह्यातील वाठोडा येथे बंधन उत्सवात प्रादेशिक सार्वजनिक माहिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. देशभरातून सुमारे २५० सदस्य सहभागी होण्याची अपेक्षा आहे. मद्यपानाच्या समस्येबाबत समाजात जनजागृती करणे आणि व्यसनमुक्तीचा संदेश गरजूंपर्यंत पोहोचवणे हा कार्यशाळेचा उद्देश आहे. यावेळी सार्वजनिक माहिती सेवा, जनजागृतीच्या रणनीती तसेच डॉक्टर, संस्था आणि नागरिकांपर्यंत ए.ए.चा संदेश पोहोचविण्याबाबत चर्चा होणार आहे. ए.ए.च्या सभा देशभरात नियमितपणे घेतल्या जात असून त्या पूर्णपणे विनामूल्य आहेत. सदस्यत्व शुल्क, जात-धर्माचा भेद किंवा राजकीय संलग्नता नसून, दारूचे सेवन थांबविण्याची इच्छा हीच प्रमुख अट आहे. कार्यशाळेत ए.ए. सदस्य आपले व्यसनमुक्तीचे अनुभवही कथन करणार आहेत.

## माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी यांच्या हस्ते गरजू कुटुंबांना तालपत्रीचे वाटप



### भाजपा चाचेर मंडळ अध्यक्ष रवी चव्हाण यांनी मानले आभार

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

रामटेक विधानसभा क्षेत्रातील चाचेर मंडळ अंतर्गत येत असलेल्या गावातील व रामटेक क्षेत्रातील इतरही गावातील गरजू कुटुंबांना गरिबांच्या हक्कांसाठी सेवेसाठी नेहमीच पुढाकार घेणारे माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी यांच्या मार्गदर्शन व सहकायार्तून मंगळवार (ता. १८ ऑगस्ट) ला तालपत्रीचे वाटप करण्यात आले. गरीब कुटुंबांना त्यांच्या अडचणीच्या काळात मदतीचा हात देण्याचा हा छोटासा प्रयत्न केला. समाजसेवा हीच खरी लोकसेवा आणि लोक सेवेतूनच जनतेच्या विश्वास प्राप्त होतो.

माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून,भाजपा चाचेर मंडळ अध्यक्ष रवी चव्हाण यांच्यासह तालपत्रीच्या लाभ घेतलेल्या सर्व कुटुंबांतील सर्व सदस्यांनी माजी आमदार रेड्डी यांची आभार मानले आहे.

## मद्यधुंद पिकअप चालकाचा बल्लारपुरात कहर : मेडिकल व्यावसायिकाचा मृत्यू, चौघे जखमी

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर (धनंजय पांढरे)**

रात्रीच्या सुमारास मद्यधुंद अवस्थेत भरधाव पिकअप वाहन चालविणाऱ्या चालकाने एकापाठोपाठ अनेकांना धडक देत कहर केला. या सिरीयल अपघातात मेडिकल व्यावसायिक अर्शद मुबारक खान ४८ वर्ष यांचा मृत्यू झाला, तर चौघे जखमी झाले. अपघातानंतर पळून जाणाऱ्या पिकअपने दहेली गावाजवळ ट्रकला धडक दिल्याने ट्रकची डिझेल टाकी फुटून रस्त्यावर मोठ्या प्रमाणात डिझेल सांडले. ही घटना रात्री सुमारे ९.३० वाजता घडली.

पिकअप क्रमांक एमएच ३२ क्यू २५९५ चा चालक बालाजी लक्ष्मण कोंडे रा. शेणगाव, ता. जिवती, जि. चंद्रपूर हा दारूच्या नशेत वाहन चालवत असल्याचे सांगण्यात येत आहे. त्याने गुरुनानक कॉलेजजवळ स्कूटी क्रमांक एमएच ३४ सीजी ७७८६ ला मागून जोरदार



धडक दिली. या धडकेत स्कूटीस्वार अर्शद खान गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. मृतक अर्शद खान यांचे बल्लारपूर आणि बामणी येथे मेडिकल स्टोअर आहेत. रात्री बामणी येथील मेडिकल स्टोअर बंद करण्यासाठी ते आपल्या स्कूटीने जात असताना काळाने त्यांच्यावर घाला घातला.

या घटनेने त्यांच्या कुटुंबीयांसह परिचितांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.दरम्यान, अर्शद खान यांना धडक दिल्यानंतर पिकअप चालकाने वाहन न थांबविता भरधाव वेगाने पळ काढला. बामणीच्या अगोदर त्याने एका जनावराला धडक दिली. त्यानंतर बामणी येथे आदित्य लक्ष्मण मृतुमोरी, रमेश मोहन मुंडेवाली ३५ वर्ष आणि प्रवीण संतोष ढेंगर ३१ वर्ष , तिघेही रा. भगतसिंग वॉर्ड, यांच्या दुचाकीला मागून धडक दिली. या तिघांना गंभीर दुखापत झाली. यानंतरही पिकअप चालकाने वाहन थांबविले नाही. पुढे प्रमोद गुरुदास निब्रड २७ वर्ष रा. बामणी यांनाही पिकअपची धडक बसली. त्यात ते जखमी झाले. अखेर दहेली गावाजवळ पिकअपने ओडी १६ के ९१९९ क्रमांकाच्या ट्रकला जोरदार धडक दिली. या धडकेत ट्रकची डिझेल टाकी फुटली आणि मोठ्या प्रमाणात डिझेल रस्त्यावर सांडले. या अपघातात पिकअप चालक बालाजी कोंडेही जखमी झाला.

घटनेची माहिती मिळताच बल्लारपूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. दहेली येथे अग्निशामक दलाचे वाहन पाठविण्यात आले. अग्निशामक दलाने पाण्याचा मारा करून रस्त्यावर सांडलेले डिझेल साफ केले. त्यामुळे संभाव्य आग व मोठ्या दुर्घटनेचा धोका टळला.सर्व जखमींना प्रथम ग्रामीण रुग्णालय, बल्लारपूर येथे दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी सामान्य रुग्णालय, चंद्रपूर येथे हलविण्यात आले. मृतक अर्शद मुबारक खान यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, बल्लारपूर येथे पाठविण्यात आला.

या थरारक सिरीयल अपघातामुळे बल्लारपूर परिसरात खळबळ उडाली असून, मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवून अनेकांच्या जीवाला धोका निर्माण करणाऱ्या चालकाविरोधात कठोर कारवाईची मागणी होत आहे. प्रकरणाचा पुढील तपास बल्लारपूर पोलीस करीत आहेत.

## पोलीस पाटलांच्या मागण्यांवर पुढील आठवड्यात मंत्रालयात बैठक

### सरळसेवा भरतीत १० टक्के आरक्षणाची मागणी, महसूल व गृह विभागातील पदांवर संधी देण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

पोलीस पाटलांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर चर्चा करण्यासाठी पुढील आठवड्यात मंत्रालयात बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. कोराडी येथे पोलीस पाटील प्रतिनिधींना चर्चेसाठी बोलावण्यात आले होते. यावेळी पोलीस पाटलांना शासकीय सेवेत संधी देण्यासह विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले, यावेळी शालिनी गजभिये, रूपाली लांडे, भूमिका हुमणे, नीतिमा गजभिये, नीता लांडे, प्रशांत वाडीभस्मे, शुभम गिरडकर आणि राम वाडीभष्मे आदी पोलीस पाटील उपस्थित



होते.

राज्यातील अनेक पोलीस पाटील उच्चशिक्षित असून पदवी, पदव्युत्तर, विविध तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण घेतलेले आहेत. त्याचबरोबर गावपातळीवर महसूल व गृह विभागाशी संबंधित विविध कामांचा त्यांना प्रत्यक्ष अनुभव आहे. त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक पात्रता आणि सेवाअनुभवाचा विचार करून महसूल व गृह विभागातील पात्र पदांच्या भरतीमध्ये पोलीस पाटलांना प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.

तसेच महाराष्ट्र शासनाच्या सरळसेवा भरतीमध्ये पोलीस पाटलांसाठी १० टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. महसूल व गृह विभागातील रिक्त पदे कंत्राटी पद्धतीने भरण्याऐवजी आवश्यक शैक्षणिक पात्रता असलेल्या पोलीस पाटलांना संधी देण्यात यावी, अशीही मागणी आहे.

दरम्यान, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कोतवालांना तलाठी भरतीमध्ये २० टक्के आरक्षण देण्याबाबत भूमिका मांडली आहे. या पार्श्वभूमीवर कोतवालांच्या धर्तीवर पोलीस पाटलांच्याही सेवाअनुभवाचा विचार करून महसूल विभागातील भरतीमध्ये विशेष आरक्षण किंवा स्वतंत्र कोटा देण्यात यावा, अशी मागणी पोलीस पाटील वर्गातून करण्यात आली.

पोलीस पाटील हे गावपातळीवरील प्रशासनाचा महत्त्वाचा घटक असून कायदा व सुव्यवस्था, गुन्ह्यांची माहिती, पंचनामा, सर्वेक्षण, निवडणुका, नैसर्गिक आपत्ती तसेच विविध प्रशासकीय कामांमध्ये ते महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे त्यांच्या अनुभवाचा शासनाने योग्य उपयोग करून घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

या मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी पुढील आठवड्यात मंत्रालयात बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन मंत्री बावनकुळे यांनी दिल्याने पोलीस पाटलांच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णयाची अपेक्षा निर्माण झाली आहे.

थोडक्यात

## श्अॅड. सुधाकर भोले लिखित 'संविधानातील मुलभूत अधिकार' पुस्तक प्रकाशन उद्या

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अॅड. सुधाकर भोले लिखित 'संविधानातील मूलभूत अधिकार, मानवाधिकार आणि माहितीचा अधिकार' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शनिवार, २२ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता बुधवार बाजार, सक्करदरा येथील संताजी सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती तथा महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूरचे माजी उपाध्यक्ष मुरलीधर गिरटकर राहणार असून महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. आमदार अॅड. अभिजीत वंजारी, सहायक पोलीस आयुक्त नरेंद्र हिवरे आणि आंतरराष्ट्रीय ह्युमन राइट्स असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष विलास कांबळे तसेच तेली समाज सभा नागपूरचे अध्यक्ष अॅड. नरेंद्र ढगे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

गौरी शिंदे, पंकज शिंदे, अमर बागडे, चंद्रमणी बोरकर, किशोर खनके, नंदा खनके, अॅड. बी. के. पाल, सच्चिदानंद दारुन्डे, दादाकांत धनविजय, अॅड. नामदेव गव्हाळे, आनंदराव ढोबळे, हरिहर मालोदे, अॅड. वैशाली खराळकर, कमलेश गुम्बले, अपर्णा गुम्बले, अर्चना जैन, सुधीर टेटे, लोकनाथ भुरे यांची देखील उपस्थिती राहणार आहे. सोहळ्यादरम्यान संगीताचा कार्यक्रम होईल. सूत्रसंचालन अनिल फुलझेले करतील. मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक अॅड. सुधाकर भोले व रत्ना भोले यांनी केले आहे.

## महापौर निता ठाकरे यांनी केली खापरी बस डेपोची पाहणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती निता ठाकरे यांनी बुधवार (ता.१९) रोजी खापरी बस डेपो येथे सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी पाहणी केली. ई-बस संचलनासाठी आवश्यक पायाभूत सुविधांचा आढावा तसेच प्रवाशांना सुरक्षित, नियमित व दर्जेदार सार्वजनिक वाहतूक सुविधा देण्याच्या दृष्टीने माहिती घेण्यात आली. यावेळी मनपा परिवहन विशेष समिती सभापती मंगला खेकरे व मनपा आयुक्त डॉ. विपीन, अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त तथा परिवहन व्यवस्थापक मिलिंद मेश्राम, प्रशासकीय अधिकारी योगेश लुंगे, कार्यकारी अभियंता अल्पना पाटणे, प्रकल्प, परिवहन अभियंता पंकज पराशर, अभिजित नेताम, धर्माळे, गजानन नागूलवार, प्रकल्प सल्लागार मेहुल रानडे, चेतन कावरे, चलो टिम खापरी डेपो येथील डिझेल व इलेक्ट्रिक बस ऑपरेटर्स व संबंधित कंत्राटदार उपस्थित होत.

पीएम ई-बस योजना अंतर्गत प्राप्त झालेल्या ७५ ई बसेस करिता आवश्यक सुविधांसंबंधित पाहणी करण्यात आली. पार्किंग व्यवस्थेसाठी केलेले नियोजन, सद्य असलेल्या बसच्या तुलनेत उपलब्ध करण्यात येत असलेले चार्जिंग स्टेशन, डेपोला आवश्यक अश्या पद्धतीची विद्युत सुविधेची पूर्तता, बसच्या देखभालीसाठी लागण्याच्या आवश्यकता सुविधा व सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. महापौरांनी डेपो अंतर्गत सुरु असलेल्या स्थापत्य विषयक कामाच्या स्थितीची माहिती घेऊन प्राधान्यक्रम निश्चित करून १५ सप्टेंबर पूर्वी डेपो चे शिल्लक कार्य करण्यासाठी संबंधित अभियंत्यांना निर्देशीत केले. यावेळी कामे केवळ वेळेत नव्हे तर निर्धारित गुणवत्तेनुसार पूर्ण करण्यात यायला हवे असे निर्देशसुद्धा देण्यात आले. ई-बस संचलनासाठी आवश्यक असलेल्या सुरक्षा मानकांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने कामावर भर असावा असे सूचित करण्यात आले.

ई- बस सेवेमुळे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था गरजू नागरिकांपर्यंत पोहचण्यात तसेच अधिक सक्षम होण्यास मदत मिळेल. प्रदूषण मुक्ततेच्या विषयावर लक्ष देऊन या मध्यमातून पर्यावरण पूरक अश्या वाहतूक व्यवस्थेचा पर्याय उपलब्ध करता येईल. भविष्यातील ई-बसच्या विस्ताराचा भागही लक्षात घेण्यात आला असून त्यानुषंगाने डेपोची क्षमता विकसित करण्याच्या दृष्टिकोणाने चर्चा करण्यात आली. यावेळी शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या सेवेसाठी आवश्यक सुविधा लवकर व गुणवत्तापूर्ण पोहचाव्या यासाठी परिवहन विभाग, स्थापत्य विभाग, अभियंता, प्रकल्प सल्लागार, बस ऑपरेटर आणि संबंधित कंत्राटदारांना समन्वयाने काम करण्याचे निर्देश दिले.

## शेतालील सोलर पंपचे केबल व सहित्य चोरी

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

खापा पोलीस स्टेशन हद्दीतील डॉ. प्रमोद डोंगरे नाईक के आउट रेल्वेस्टेशन रोड सावनेर यांच्या शेतातून चोरट्यांनी सोलर मोटरपंपाचे



केबल व आन्य साहीत्य लंपास केल्याची घटना उघडकीस आली. मिळालेल्या माहितीनुसार डॉ. प्रोद डोंगरे यांची खापा पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा तिघई येथे १०४/३ क्रमांकांची शेती आहे चालू वर्षात शासकिय योजने अंतर्गत दि. २६ मार्च रोजी सौर मोटर पंप बसविला होता. दि. १८/०८/२०२६ रोजी शेतात पिकपाणी पाहव्यासाने गेले असता सोलर मोटर पर्यंतचा केबल व इतर सहित्य अंदाजे १२ हजार रपयाचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे निदर्शनास येताच सदर घटनेची माहीती पोलिस पाटील उमाकांत खडके तिघई यांना मोबाईल सारे माहिती दिली. व पोलिस स्टेशन खापा येथे लेखी तक्रार दाखल केली असुन पोलीस हवालदार प्रकाश नांदूरकर यांनी घटना स्थळी प्रत्यक्ष पाहणी करुण अज्ञात चोरट्यांचा विरोधात गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास ठाणेदार काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# ज्येष्ठांच्या उत्साहाला 'सेकंड इनिंग'ची रंगत

### ६५ ते ८५ वयोगटातील ज्येष्ठांचा फॅशन शो; रॅम्प वॉकसह नृत्य, अभिनयाने रंगला सोहळा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ओसरी प्रॉडक्शन्सच्या वतीने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी 'ज्येष्ठ नागरिक फॅशन शो : सेकंड इनिंग'चे आयोजन करण्यात आले. शंकरनगर चौकातील साई सभागृहात २१ ऑगस्ट रोजी होणाऱ्या जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाच्या पूर्वसंध्येला हा आगळावेगळा कार्यक्रम उत्साहात पार पडला. ज्येष्ठांच्या आयुष्यात उत्साहाचे नवे रंग भरत त्यांना आपले कलागुण सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या आयोजनामागील उद्देश होता.

फॅशन शोमागची प्रेरणा सांगताना विष्णू मनोहर म्हणाले, आजचा हा तिसरा सीझन आहे. सुमारे १४ वर्षांपूर्वी आम्ही पहिल्यांदा ज्येष्ठ नागरिकांचा फॅशन शो आयोजित केला होता. त्यानंतर काही काळाने पुन्हा एकदा आयोजन केले आणि आता हा तिसरा सीझन आहे. आमच्या घरी तीन सुना मेहंदी, मेकअप करताना पाहून एकदा आईनेही ह्यमी पण करून पाहू का? असे विचारले. तेव्हा जाणवले की ज्येष्ठ नागरिकांनाही कधीतरी स्वतःसाठी मेकअप करावा, छान कपडे घालावेत आणि रॅम्प वॉक करावा, अशी इच्छा असते. आईनेही 'मलाही रॅम्प वॉक करायचा आहे, छान कपडे परिधान करायचे आहेत,' अशी इच्छा व्यक्त केली. त्यातूनच ज्येष्ठ नागरिकांसाठी फॅशन शो आयोजित करण्याची कल्पना सुचली. त्यानंतर हा उपक्रम सुरू झाला आणि आज आपण या तिसऱ्या सीझनपर्यंत पोहोचलो आहोत.

कार्यक्रमाला जयप्रकाश गुप्ता, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी, सुप्रसिद्ध शेफ विष्णु मनोहर, स्मिता हॉलिडेजचे जयंत गोरे, रोटरी क्लबच्या अध्यक्षा स्वप्ना नायर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कारागृह अधीक्षक वैभव आगे व दीपा आगे, माहा चाय चे सी. एम. डी. प्रदीप कुळकर्णी, पिंकू जोसेफ यांचीही उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाची सुरुवात गौरी जथे हिच्या सुंदर नृत्याने झाली. तिच्या सादरीकरणाला प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. डॉ. स्मिता दाभोळकर-सिंग यांच्या स्टँडअप कॉमेडीनेही प्रेक्षकांचे मनोरंजन केले. या फॅशन शोमध्ये ६५ ते ८५ वर्षे वयोगटातील ज्येष्ठ स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यांच्या उत्साहाने आणि आत्मविश्वासाने सभागृह टाळ्या व शिट्ट्यांनी दणाणून गेले.

फॅशन शोमध्ये रेट्रो, फंकी आणि पारंपरिक अशा तीन फेऱ्या घेण्यात आल्या. रेट्रो फेरीत स्पर्धकांनी ९०च्या दशकातील वेशभूषा साकारली. फंकी फेरीत आपल्या मनातील भावना आणि कल्पना विविध रूपांतून सादर केल्या, तर पारंपरिक फेरीत भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या वेशभूषा सादर करण्यात आल्या. याशिवाय स्पर्धकांनी नृत्य, अभिनय आदी कलांचेही उत्कृष्ट सादरीकरण केले. त्याला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मनिषा बावनकर, प्रांजली शेवाळे व विजय जथे यांनी शोचे कोरिओग्राफर म्हणून काम पाहिले, तर सूत्रसंचालन विजय जथे यांनी केले.

या उपक्रमाला विष्णुजी की रसोई, रोटरी एलिट, स्मिता हॉलिडेज, गिफ्ट फॅक्टरी, देशकर होमिओ क्लिनिक, एम.डी. ट्रॅव्हल, सीएसी ऑलराऊंडर, राधेश्याम झनकलाल, सयाजी हॉटेल आणि माहाचहा यांचे सहकार्य लाभले.

- सर्वोत्कृष्ट हास्य - डॉ. अरुणा जगताप
- सर्वोत्कृष्ट ऊर्जा - दीपक ढोके
- सर्वोत्कृष्ट सादरीकरण - भीमराव कांबळे
- सर्वोत्कृष्ट वेशभूषा - मोहन जरकर
- सर्वोत्कृष्ट जोडी - सुनील गावपांडे आणि प्रकाश कुलकर्णी
- तृतीय क्रमांक - लक्ष्मीकांत कोठारी
- द्वितीय क्रमांक - सुरेशकुमार मौर्य
- प्रथम क्रमांक - छबी चक्रवर्ती

# वाढत्या अतिक्रमणांमुळे शहर प्रशासन चिंतीत

### राज्य शासनाच्या संरक्षणाखालील गडकरी निवासस्थान अतिक्रमणमुक्त



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

शहरातील वाढते अतिक्रमण आणि रस्ते अपघातांबद्दल चिंतित होऊन, शहर प्रशासनाने अतिक्रमणविरोधी कारवाई सुरू केली असून शहरातील मुख्य रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवण्यास सुरुवात केली आहे. यामुळे रस्त्यांवर दुकाने थाटून वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या दुकानदारांमध्ये घबराट पसरली आहे.

सावनेर नगर परिषदेच्या मुख्य अधिकारी, अर्शिया जुही यांनी आपल्या अधिनस्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह, आज शहरातील सर्वात वर्दळीच्या गांधी पुतळा चौकात असलेल्या महान साहित्यिक आणि नाटककार श्री. राम गणेश गडकरी यांच्या राज्य-संरक्षित निवासस्थानाजवळ अतिक्रमणविरोधी कारवाई सुरू केली.ज्यांनी सदर जागेला आपली वडिलोपार्जित मालमत्ता समजून रस्त्यावर मोठी दुकाने थाटली होती, त्यांच्यामध्ये यामुळे घबराटीचे वातावरण निर्माण झाले.

क्षणातच, दुकानदारांनी आपली पसरलेली दुकाने हटवण्यास सुरुवात केली, परिणामी ऐतिहासिक कैलासवासी राम गणेश गडकरी यांचे निवासस्थान अतिक्रमणमुक्त झाले. रस्ता पादचाऱ्यांसाठी पुरेसा रुंद दिसू लागला. सावनेर नगर परिषदेच्या मुख्य अधिकारी अर्शिया जुही यांनी दुकानदारांना या ठिकाणी पुन्हा दुकाने न थाटण्याचे निर्देश देताना, उद्यापासून सदर ठिकाणी दुकाने थाटल्यास ती जप्त करण्याबरोबरच दंडात्मक कारवाई केली जाईल, अश्या सुचना ही केल्या.

नगरवासीयांनी मुख्याधिकारी अर्शिया जुही यांच्या या जलद कारवाईचे स्वागत केले असुन अश्याच प्रकारची कारवाई शहरातील जयस्तंभ, बाजार चौक, गडकरी चौक, गांधी चौक, बस स्टँड, नागपूर रोड, छिंदवाडा रोड इत्यादी ठिकाणचे अतिक्रमण हटवण्या बरोबरच, या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही याकडे लक्ष देण्याची मागणी वाढू लागली आहे.

# कथालेखन ही एक उत्कट कला : सुरेश आकुडकर

### विविधरंगी कथांनी रंगला 'झपूर्झा' साहित्य कट्टा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कथालेखन ही एक उत्कट कला असून समृद्ध वाचन, सततचा सराव आणि शब्दांचे नेटके संपादन यातूनच दर्जेदार कथाकारांची निर्मिती होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व कथाकार सुरेश आकुटकर यांनी केले.

विदर्भ साहित्य संघाच्या वतीने दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी नियमितपणे आयोजित करण्यात येणारा 'झपूर्झा' साहित्य कट्टा उपक्रम विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयात उत्साहात संपन्न झाला. विविध साहित्यिकांनी सादर केलेल्या कथांमुळे कार्यक्रमाला साहित्यिक रंगत लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक, वक्ते व कथाकार सुरेश आकुटकर होते. ज्येष्ठ लेखिका तथा विदर्भ साहित्य संघाच्या उपाध्यक्ष अरुणा सबाने आणि अमर कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. अरुणा सबाने यांनी विदर्भाच्या समृद्ध साहित्यिक परंपरेचा उल्लेख केला. सध्या मंदावलेल्या कथा प्रवाहाला पुन्हा गती देण्यासाठी नवोदितांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी पत्रकार पराग मगर यांनी गावातील 'भाली' नावाच्या वृद्धाच्या आठवणी आणि मयतीच्या प्रसंगी घडणाऱ्या घटनांचे वास्तववादी चित्रण करणारी 'गावचा भाली' ही कथा सादर केली. अरुणा भोंडे यांनी 'जादूची वाकही', के. आर. बजाज यांनी 'नेहूर', तर प्रीती तिरपुडे यांनी 'पदर' या कथा सादर केल्या. सुजाता लोखंडे यांनी आईच्या वात्सल्याची आणि दुःखाची करुण कहाणी मांडणारी 'श्रावणी' ही कथा सादर केली. तर सुधीर घारे यांनी देवधर्माचा बहाणा करून उपवासाच्या नावाखाली पोटभर खाणाऱ्या एका स्त्रीच्या खादाडपणावर विनोदी भाष्य करणारी 'उपवासिका बाई' ही कथा सादर करून उपस्थितांना खळखळून हसविले. कल्पना नरांजे यांनी गरीब मुलगा अभय याच्या आईने केलेल्या संस्कारांमुळे आणि प्रामाणिकपणाच्या बळावर मिळालेल्या यशाची कथा 'संस्कार' सादर केली.

तसेच मोहन पांडे यांनी माणसांपेक्षा प्राण्यांमध्येच अधिक माणुसकी असते आणि खरी शांतता शहरात नसून जंगलातच असते, असा संदेश देणारी 'वाइल्ड लाइफ' ही कथा सादर करून श्रोत्यांची मने जिंकली. कविता कराडे यांनी स्वावलंबीपणे जगण्यासाठी संघर्ष करणाऱ्या स्त्रीची कहाणी 'विभक्त' या कथेतून मांडली. संगीता दहीकर यांनी 'दान', तर पटवर्धन यांनी 'अशक्यात शक्य करतील स्वामी' आणि 'महानगर' या कथा सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनश्री पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन शुभदा फडणवीस यांनी केले.

# मंथन ४ युवा : चित्रकला स्पर्धेला ७० हजार विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

### कॅम्पस लीडर समिटमध्ये नेतृत्वाचे धडे



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

'मंथन ४ युवा - नागपूर २०२६' अंतर्गत आयोजित शालेय गटाच्या चित्रकला स्पर्धेला नागपूर शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. २०० हून अधिक शाळांनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत जवळपास ७० हजार विद्यार्थ्यांनी चित्रे सादर केली, तर त्यातून निवड झालेल्या अडीच हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी अंतिम फेरीत सहभाग घेतला.

स्पर्धेच्या 'बी' गटाची अंतिम फेरी बी. आर. मुंडले ब्लाइंड असोसिएशन येथे, तर 'सी'गटाची अंतिम फेरी शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर येथे उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि कलात्मक अभिव्यक्तीला व्यासपीठ देणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

यावेळी समाजसेवक आशिषजी फडणवीस, लोकसत्ताचे संपादक देवेंद्र गावंडे, हितवादचे ज्येष्ठ पत्रकार विकास वैद्य, कला संचालनालय, मुंबईचे कलासंचालक डॉ. किशोर इंगळे, तसेच शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालयाचे विभागप्रमुख संजय जठार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेचे मुख्य संयोजक विष्णू वागदे व रितेश गावंडे असून डॉ. सचिन हजारे, प्रफुल्ल नायसे, श्रीकांत गडकरी, किशोर सोनटक्के आणि नरेंद्र बाराई यांनी आयोजनात योगदान दिले. महाविद्यालयातील ४० हून अधिक विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून जबाबदारी सांभाळली.

दरम्यान, मंथन फॉर युवा तर्फे आयोजित कॅम्पस लीडर समिटही उत्साहात पार पडले. विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) संदीप पाटील यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्वगुण विकसित करण्याबाबत मार्गदर्शन केले आणि त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. या समिटसाठी तब्बल ५०० विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. सहभागी विद्यार्थ्यांनी आपल्या क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीवर स्वलिखित निबंध सादर केला होता.

## भव्य कावड यात्रेचे आयोजन, महिलांचा उत्सफुर्त सहभाग

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

वाघोडा डब्लूसीएल येथे श्रावण महिन्याचे अवचित्या साधून शक्तीनगर येथील शिवमंदिर येथून कावड यात्रा काढण्यात आली या कावड यात्रेत शेकडो महिला आणि शिवभक्त ढोल ताश्याच्या गजरात हरहर महादेव चे नारे देत नागपुर रोडवर स्थीत पुरातन डोमनशेष नागमदींरात पोहचुन जलाभिषेक करण्यात आले याप्रसंगी युवा समाजसेवी तसेच भारतीय जनता पार्टी युवमोच्यार्चे जिव्हा सचिव निखिल पोटभरे, महिला आघाडीच्या जिल्हामंत्री भारती आठणकर, तालुका अध्यक्ष रेखाताई पोटभरे,मायाबाई शंभरकर, माया धुर्वे, पार्वती देहेरिया ,आशिष माटे, वाघोडा ग्राम पंचायत चे सदस्य राकेश सूर्यवंशी, प्रणय बातोले, अनिता बेलवंशी, अश्मित राव, महेंद्र उपाध्याय, मदन बडाखे,गणेश बोडखे आदी ने सफलतपूर्वक सहयोग करण्यात आला.

कावड यात्रेत सहभागींनी मार्गभ्रमन करत श्रावण महिन्यातील प्रसिद्ध गीत व नुत्य करत नागमदींरात पोहचुन पुजा अर्चना व जलाभिषेक केल्यानंतर आयोजकांनी फळ वितरित करुण कावड यात्रेची सांगता करण्यात आली.



थोडक्यात

## श्रावणाच्या पावन पर्वावर आमगावात रंगणार 'सावन झुला' कार्यक्रम

### समस्त लोधी समाज महिला मंडळाचा पुढाकार; महिलांसाठी विविध मनोरंजक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

श्रावण महिन्याच्या पावन पर्वाचे औचित्य साधून समस्त लोधी समाज महिला मंडळाच्या वतीने 'सावन झुला कार्यक्रम' आयोजित करण्यात आला आहे. बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२ वाजता साई लॉन, सालेकसा रोड, आमगाव येथे हा कार्यक्रम उत्साहात पार पडणार आहे. श्रावण महिन्यातील पारंपरिक उत्साह, संस्कृती आणि महिलांचा सामाजिक सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात वीरांगना राणी अवंतीबाई लोधी यांच्या प्रतिमेचे पूजन, विविध मनोरंजक खेळ, श्रावणातील पारंपरिक गीते, झोका घेण्याचा आनंद तसेच महिलांच्या नृत्यासह विविध सांस्कृतिक व मनोरंजक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजातील महिला भगिनींना एकत्र येऊन आनंदाचे क्षण अनुभवण्यासोबतच सामाजिक एकता, बंधुभाव आणि महिला सक्षमीकरणाला चालना देण्याची संधी मिळणार आहे. कार्यक्रमासाठी हिरव्या रंगाची साडी हा विशेष ड्रेस कोड ठेवण्यात आला आहे. 'सावन झुला' कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यक्रम समितीच्या वतीने जय्यत तयारी करण्यात येत आहे. समाजातील सर्व मातृशक्तींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आनंदोत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन सावन झुला कार्यक्रमाच्या संयोजक सुखवंता बनोठे यांनी केले आहे.

## महावितरण कार्यालयात सद्भावना दिवस प्रतिज्ञा




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारताचे माजी पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त महावितरण कार्यालयात अधीक्षक अभियंता दिपाली माडेलवार यांनी महावितरण कार्यालयातील सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांना सद्भावना दिवसाची प्रतिज्ञा दिली. महावितरणच्या काटोल मार्गावरील विद्युत भवन येथे जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करण्याची, तसेच सर्व प्रकारचे मतभेद हिंसाचाराचा अवलंब न करता संविधानिक मार्गाने सोडविण्याची प्रतिज्ञा अधीक्षक अभियंता यांनी उपस्थितांना दिली. याप्रसंगी अधीक्षक अभियंता अमित परांजपे, उप महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, कार्यकारी अभियंता अमित शिवलकर, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) सुधीर टेकाम, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर यांच्यासह महावितरणचे अधिकारी, अभियंते व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम २३ ऑगस्टला

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी महाल



येथील गडकरी वाडा येथे आयोजित करण्यात आला आहे. महालातील गडकरी वाडा येथे मा. मंत्री महोदय यांच्या जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची निवेदने स्वीकारतील. मा. मंत्री महोदय नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपातच (आवश्यक कागदपत्रे जोडून) आणाव्यात. तसेच आपली लेखी निवेदने मा. मंत्री महोदयांना द्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारी १ ते २ या कालावधीत नितीन गडकरी आपल्या जनसंपर्क कार्यालयात भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटतील.

## अतिक्रमण व अवैध बांधकामाच्या विरोधात कार्यवाही सुरूच

### महापौरांच्या निर्देशांची अंमलबजावणी करत एकाच झोनच्या सहा आस्थापनांना नोटीस

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महापौर निता ठाकरे यांनी दिलेल्या निर्देशानुसार, शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात कठोर कार्यवाही करण्यात येत आहे. शहरातील अतिक्रमण व अवैध बांधकामाच्या विरोधात नागपूर महानगरपालिकेने धडक कार्यवाही करीत गुरुवारी (ता. २०) सर्व दहाही झोनमध्ये नोटीस कारवाईला वेग आला आहे. विशेष म्हणजे, लक्ष्मीनगर झोन अंतर्गत परिसरातील अतिक्रमणांविरोधात धडक कार्यवाही करण्यात आली असून, आवश्यक ठिकाणी पोलीस दलाच्या मदतीने ठेले जप्त करण्यात आली आहे. तसेच धंतोली झोन मध्ये सहा आस्थापना यांना नोटीस बजाविण्यात आल्या. महापौरांच्या निर्देशानुसार मनपाच्या संबंधित विभाग व झोन कार्यालयांमार्फत शहरातील विविध भागांमध्ये अतिक्रमणांची व अनधिकृत बांधकामांची पाहणी करण्यात येत असून, नियमांचे उल्लंघन आढळलेल्या संबंधितांना नोटीस बजावण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. यामध्ये कार शोरूम, फर्निचर गोडाऊन, टिम्बर मिलच या आस्थापना तसेच इतर स्वरूपाच्या अनधिकृत बांधकामांचा समावेश आहे.

लक्ष्मीनगर झोन अंतर्गत शंकर नगर, बजाज नगर, लक्ष्मीनगर, श्रद्धानंदपेठ, या परिसरांतील अवैध बांधकाम व अतिक्रमणाची पाहणी करण्यात आली. त्यानुसार येथील अतिक्रमण करणाऱ्या दुकानांच्या विरोधात पोलीस दलाच्या मदतीने आवश्यक ठिकाणी दुकाने जप्तीची कार्यवाही करण्यात आली आहे.

# पर्यटनस्थळ म्हणून अंबाझरी तलाव विकसित करणार

### मुख्यमंत्र्यांनी केली अंबाझरी तलाव परिसराची पाहणी, अंबाझरी तलावात मुख्यमंत्र्यांचा नौकाविहार

**दै. सिंहवाणी वृत्त,नागपूर**

शहरातील ऐतिहासिक अंबाझरी तलाव पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्यात येईल व त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज (ता. २०) अंबाझरी तलाव परिसराची पाहणी करून नौकाविहाराचा आनंद घेतला. पर्यावरणासाठी घातक असलेली जलपर्णी नष्ट करून ऐतिहासिक अंबाझरी तलावाचे सौंदर्य अबाधित राखल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर महानगरपालिकेच्या उपक्रमाचे कौतुक केले.



यावेळी महापौर निता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर आयुक्त डॉ. विपीन यांच्यासह अनेक नगरसेवक उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंबाझरी तलाव जलपर्णी विळख्यातून मुक्त करण्याच्या मनपाच्या मोहिमेची माहिती जाणून घेतली.

**मनपाचे कार्य प्रशंसनीय : मुख्यमंत्री फडणवीस**

अंबाझरी तलावाची पाहणी केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, अंबाझरी तलाव हा नागपूरच्या सांस्कृतिक वारश्याचा एक भाग आहे. नागपूरला पाणी पुरवठ्याचा एक स्त्रोत म्हणून अंबाझरी तलाव होता. या तलावातून इंग्रजांच्या काळात नागपूरला पाण्याचा पुरवठा होत होता. एक प्रेक्षणीय स्थळ म्हणून अंबाझरीचा नेहमी उल्लेख केला जात होता. परंतु गेल्या काही काळापासून या तलावाला जलपर्णीचा विळखा बसला होता. यामुळे या अंबाझरी तलाव नष्ट होतो की, अशी भीती निर्माण झाली होती. परंतु नागपूर महानगरपालिकेने अत्यंत चांगली मोहिम राबवून अंबाझरी तलाव जलपर्णी मुक्त केला आहे. हा उपक्रम खरोखरच प्रशंसनीय आहे. भविष्यात अंबाझरी तलाव पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्यासाठी राज्य सरकारकडून निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

एमआयडीसीतून येणार्या दूषित पाण्याचा पुरवठा रोखण्यासाठी वाडी नगर पंचायतचा एक सिवरेज प्रक्रिया केंद्र (एसटीपी) लवकरच सुरू होणार आहे. त्यामुळे प्रक्रिया केलेले पाणी अंबाझरी तलावात येईल. यामुळे यापुढे जलपर्णी या तलावात दिसणार नाही. या तलावात कायकिंग सह इतर जलक्रीडाचे प्रकार सुरू व्हावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. अंबाझरी तलावाची पाहणी झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे महापौर निता ठाकरे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

**सर्वांच्या प्रयत्नांना यशः महापौर**

अंबाझरी तलावातून जलपर्णी काढण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले आहे. स्थानिक नगरसेवक, मनपा प्रशासन यांनी नियमितपणे जलपर्णी काढण्यासाठी प्रत्यन केले. यामुळे तलावाचे वैभव आज परत येत असल्याचे महापौर निता ठाकरे यांनी सांगितले.

**विशेष मोहिमेला यश**

गेल्या काही महिन्यांपासून मनपातर्फे अंबाझरी या ऐतिहासिक तलावातील जलपर्णी काढण्यासाठी विशेष मोहिम राबविली जात आहे. पर्यावरणासाठी घातक असलेल्या जलपणीर्ने संपूर्ण अंबाझरी तलावात जाळे पसरले होते. यामुळे या तलावात पोहण्यासाठी येणाऱ्या जलतरणपटूंची अडचण होत होती. या ऐतिहिसिक तलावाची जलपर्णीच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी महापौर निता ठाकरे यांच्या नेतृत्वात ही मोहिम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

यासाठी जेसीबी तसेच वीड हार्वेस्टरचा उपयोग करून जलपणीर्चे निर्मूलन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायकिंग स्पर्धेसाठी सराव करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले व मनपाचा मानाचा दुपट्टा देवून त्यांचा सत्कार केला.

या पाहणीच्यावेळी उपमहापौर लिला हाथीबेड, माजी महापौर दयाशंकर तिवारी, धरमपेठ झोन सभापती धनश्री देशपांडे, लक्ष्मीनगर झोन सभापती लक्ष्मी यादव, हनुमानगर झोन सभापती ज्योती देवघरे, परिवहन समितीच्या सभापती मंगला खेकरे, गांधीबागच्या झोन सभापती उमा देशमुख, क्रीडा विशेष समितीच्या सभापती दर्शनी धवड, स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीच्या सभापती अश्विनी जिचकार यांची उपस्थिती होती.

## मराठी भाषा प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या ६६ अमराठी वाहनचालकांना प्रमाणपत्र वाटप

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** राज्यात मराठी भाषेचा प्रचार व प्रसार अधिक प्रभावीपणे व्हावा तसेच सर्वसामान्य नागरिकांशी संवाद साधताना प्रवासी वाहन चालकांना मराठी भाषेचा व्यवहारात उपयोग करता यावा, या उद्देशाने परिवहन विभागामार्फत अमराठी चालकांसाठी 'व्यवहारीक मराठी भाषा' शिकवणी वर्ग सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर उपक्रम राज्य मराठी विकास संस्था, कोकण मराठी साहित्य परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ व परिवहन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑगस्टपर्यंत राबविण्यात आला. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या ६६ ऑटोरिक्षा चालकांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास प्रा. सपन नेहरोत्रा, डॉ. गायत्री ताजने, प्रा. सुरेश नखाते, विजय चव्हाण, प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर (ग्रामीण), किरण बिडकर, प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर (शहर), अविनाश राऊत. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर (पूर्व), विदर्भ ऑटोरिक्षा संघटनेचे पदाधिकारी विलास भालेकर तसेच इतर ऑटोरिक्षा संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## बॅरिकेड तुटले, अवजड वाहनांसाठी पुलाचा मार्ग खुला

### सालेकसा-आमगाव मार्गावर अपघाताचा धोका वाढला, पुढील बंद बॅरिकेडिंगची ट्रकचालकांना माहिती नसल्याने अडचण

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

सालेकसा-आमगाव मार्गावरील बाघ नदी पुलाजवळ अवजड वाहने रोखण्यासाठी लावण्यात आलेले बॅरिकेड पूर्णपणे तुटले आहे. त्यामुळे अवजड वाहने थेट पुलापर्यंत पोहोचत आहेत. पुलाच्या पुढे बॅरिकेडिंग बंद असल्याची माहिती नसल्याने बाहेरून येणाऱ्या ट्रकचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.



पावसामुळे पुलाच्या रस्त्यावर ठिकठिकाणी पाणी साचले असून रस्ताही निसरडा झाला आहे. अशा परिस्थितीत अवजड वाहने पुलापर्यंत पोहोचल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पुलाची स्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने यापूर्वी वाहनांचा प्रवेश रोखण्यासाठी बॅरिकेड लावले होते; मात्र बॅरिकेड तुटल्यामुळे ही सुरक्षा व्यवस्था प्रभावी राहिलेली नाही.

**ट्रकचालकांना होत आहे त्रास**

सालेकसा-आमगाव मार्गावर दररोज मोठ्या संख्येने लहान-मोठ्या वाहनांची वर्दळ असते. बॅरिकेड तुटल्यामुळे बाहेरून येणारे ट्रकचालक अनवधानाने पुलापर्यंत पोहोचतात. पुलाच्या पुढे बॅरिकेडिंग बंद असल्याने त्यांना वाहने परत वळवताना मोठ्या अडचणी येतात. त्यामुळे पुलावर वाहतूक विस्कळीत होऊन वाहतूक कोंडी निर्माण होण्याची शक्यताही आहे.

**तातडीने मजबूत बॅरिकेड लावण्याची मागणी**

स्थानिक नागरिकांनी संबंधित विभाग आणि प्रशासनाकडे मागणी केली आहे की, तुटलेले बॅरिकेड तातडीने दुरुस्त करून मजबूत व कायमस्वरूपी बॅरिकेडिंग करण्यात यावे. तसेच पुलाच्या आधी स्पष्ट धोक्याचे व मार्ग बंद असल्याचे सूचना फलक लावण्यात यावेत, जेणेकरून अवजड वाहनचालकांना पुढील परिस्थितीची आधीच माहिती मिळू शकेल.

ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, मोठ्या अपघाताची वाट न पाहता प्रशासनाने तातडीने प्रभावी सुरक्षा उपाययोजना कराव्यात, जेणेकरून प्रवासी, वाहनचालक आणि पादचाऱ्यांची सुरक्षितता सुनिश्चित होईल.

## उपक्रमशील शिक्षिका श्रद्धा वडनेरकर यांची जिल्हा मराठी भाषा समितीवर निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, भंडारा**

श्रीमती एस. एस. सारडा महिला समाज माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, भंडारा येथील उपक्रमशील शिक्षिका श्रद्धा माधव वडनेरकर यांची भंडारा जिल्हा मराठी भाषा समितीवर निवड करण्यात आली आहे.भंडारा जिल्हाधिकारी सावन कुमार



(भाप्रसे) यांनी नुकतीच ही निवड केली. भंडारा शहरात श्रद्धा वडनेरकर या उपक्रमशील व प्रयोगशील शिक्षिका म्हणून परिचित आहेत. मराठी भाषेचे जतन, संवर्धन व प्रचार-प्रसारासाठी त्यांनी शाळेत विविध सहशालेय उपक्रम प्रभावीपणे राबविले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी आवड निर्माण व्हावी, त्यांच्या भाषिक कौशल्यांचा विकास व्हावा, यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील असतात. इयत्ता दहावीच्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परीक्षेत मागील दहा वर्षांपासून त्यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विषयाचा शंभर टक्के निकाल लागला आहे. मराठी भाषा व शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन जिल्हा मराठी भाषा समितीवर त्यांची निवड करण्यात आली आहे.

जिल्हा मराठी भाषा समितीचे प्रमुख कार्य म्हणजे मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धन करणे, शासकीय कामकाजात मराठी भाषेचा प्रभावी वापर वाढविणे, शुद्धलेखन व व्याकरणाबाबत जनजागृती करणे तसेच साहित्यिक व सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन देणे होय. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी प्रेम व अभिमान निर्माण करण्यासाठी मराठी भाषा गौरव दिन, निबंध, वक्तृत्व, काव्यवाचन यांसारख्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासही समिती प्रोत्साहन देते. श्रद्धा वडनेरकर यांच्या निवडीबद्दल संस्थेच्या अध्यक्षा डॉ. विशाखा गुप्ते, सचिव नूतन मोघे, मुख्याध्यापिका वैशाली धारस्कर, स्मिता काळबांधे, प्रमोद सेलोकर, सुनील देवगडे, सुधाकर धाडसे, राजेंद्र हेडाऊ, डॉ. मनीष कोल्हे, सुप्रिया भुते, गौरी बावनकर आदींनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# ग्रामसभा तहकुब, ग्रामस्थांचा पंचायत समीतीवर हल्लाबोल

- बिडीओंसमोर समस्यांचा मांडला ढिग
- ग्रामपंचायत अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी
- सरपंचाविरोधात लोकात उफाळला संताप
- जेनझीपासून तर वृद्धांपर्यंत लोकं झाले सहभागी
- बिडिओंनी केले शांततेने समाधान

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

पंचायत समिती रामटेक अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत उमरी ( चिचदा ) येथे आज दिनांक १९ ऑगस्टला आयोजित केलेली ग्रामसभा रद्द झाली त्यामुळे तेथील लोकांचा संताप अनावर झाला व ग्रामस्थांनी माजी पंचायत समिती सभापती कैलास राऊत यांच्या नेतृत्वात रामटेक पंचायत समितीवर हल्लाबोल केला यावेळी शंभर ते दीडशे नागरिक उपस्थित होते. उल्लेखनीय म्हणजे यात जेन्झी पासून तर वृद्धांपर्यंत लोकं आपली सर्व कामे बाजूला सारून आलेले होते. लोकांचा संताप पाहून यावेळी बिडीओ जयसिंग जाधव यांनी सर्वांचे ऐकून घेत शेवटी शांततेने समस्यांचे निराकरण केले.

लोकांची उपस्थिती असूनही ग्रामसभा तहकूब करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकारी तथा सरपंच यांच्यावर कारवाईची मागणी यावेळी लोकांनी रेटून धरली. ग्रामपंचायत उमरी (चिचदा ) अंतर्गत येणाऱ्या गावांमधील काही लोकांनी आपापल्या गावातील समस्या विशेषतः पाण्याच्या समस्येबद्दल बीडीओंना जाब



विचारला. तरुण तरुणींनी हिम्मत करून सरपंच तथा ग्रामपंचायत अधिकाऱ्याबद्दल बीडीओंकडे तक्रार केली. यावेळी कुणी पाणि समस्येबद्दल सांगत होते तर कुणी रस्त्याबाबद तर कुणी सार्वजनिक शौचालयाच्या दुरावस्थेबद्दल.

तसेच माजी सभापती कैलास राऊत यांनी आज दि. १९ ऑगस्टची रद्द झालेली सभा उद्या निश्चित करावी अन्यथा आम्ही गावकरी ग्रामपंचायत कार्यालयाला कुलुप लावु असे ठामपणे सांगितले. यावेळी नागरीकांचा रोष पाहुन बिडिओ जयसिंग जाधव यांनी प्रसंगावधान दाखवून परिस्थिती हाताळत सर्वांना अगोदर शांत केले व ग्रामपंचायत अधिकाऱ्याला उद्याला ग्रामसभेचे नियोजन करायला सांगतो असे सांगत मी स्वतः या प्रकरणाची चौकशी करून किमान एक महिन्यात आपल्या समस्या मार्गी लावण्याचा प्रयत्न करतो असे ग्रामस्थांना सांगीतले. तेव्हा सर्व गावकरी शांत झाले व आपआपल्या घरी परतले.

**कोरम पुर्ण झाले नव्हते : ग्रा.पं. अधिकारी बानाबाकोडे**

आज १९ ऑगस्ट ची ग्रामसभा तहकुब का केली? असा प्रश्न ग्रामपंचायत उमरी ( चिचदा ) चे ग्रामपंचायत अधिकारी कृष्णा बानाबाकोडे यांना भ्रमणध्वनीवर केला असता ' ग्रामसभेसाठी लागणारे कोरम पूर्ण झालेले नव्हते. नियमानुसार ग्रामसभेसाठी कमीत कमी शंभर लोकांची उपस्थिती अनिवार्य असते मात्र आजच्या ग्रामसभेला फक्त ७६ लोकंच उपस्थित असल्याने नाईलाजास्त ग्रामसभा तहकूब करण्यात आली असल्याचे ग्रामपंचायत अधिकारी कृष्णा बानाबाकोडे यांनी माहिती देताना सांगितले.

माहितीनुसार ग्रामपंचायत उमरी (चिचदा) चे ग्रामपंचायत अधिकारी कृष्णा बानाबाकोडे यांच्याकडे ग्रामपंचायत उमरी ( चिचदा) चा नियमीत कायमस्वरूपी तर तालुक्यातील आर्थिक बाबीने सक्षम असलेल्या नगरधन ग्रामपंचायत चा अतिरिक्त कार्यभार आहे. जेव्हा की ग्रामपंचायत नगरधन सारख्या मोठ्या ग्रामपंचायतीला एक वेगळा व नियमित कायमस्वरूपी ग्रामपंचायत अधिकारी असायला पाहिजे. अशा परिस्थितीत दोन ग्रामपंचायतींचा कार्यभार सांभाळत असताना कुठे ना कुठे कामांमध्ये अनियमित्ता होत असते हे स्वाभाविकच म्हणावे लागेल असे काही सुज्ञ मंडळींनी मत व्यक्त केले.